

अंक अकरावा
व्हाईस ऑफ ट्रुथ
इंटरनॅशनल
THE VOICE OF TRUTH
INTERNATIONAL
Volume Eleven

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय - अमुल बनसोड | ४ |
| २) | आम्ही कोणाची उपासना करावी - जे.सी. चोट | १० |
| ३) | उपासना - जेरी बेट्स | १४ |
| ४) | मला सुवार्तेची लाज वाटत नाही - फ्रान्सिस डेविड | १९ |
| ५) | ख्रिस्ती बनल्यानंतर- रॉइस फ्रेड्रिक | २४ |
| ६) | सर्वांकरीता परमेश्वराची कृपा - माईकल एल. किंग | २९ |
| ७) | दृष्टी वर लावली... - बेट्टी बर्टन चोट | ३३ |
| ८) | बाप्तिस्म्यामध्ये काय घडते ? - - जेरी बेट्स | ३७ |
| ९) | आत्म्याविषयी काळजी - लुईस रशमोअर | ४० |
| १०) | तुम्ही देवाच्या वचनावर वाद घालू शकत नाही - जे.सी.चोट | ४५ |
| ११) | जेव्हा परमेश्वर "नाही" म्हणतो - जिम पोलॅन्ड | ४९ |
| १२) | जोखीम, प्रीति आणि यज्ञ - चार्लस् आर. रोझ | ५१ |
| १३) | सहा दिवसांत निर्मिती - केविन एल. मुरे | ५६ |
| १४) | येशू रडला : योहान ११:३५ - जे.सी.चोट | ५८ |
| १५) | सेवक वडील - - जेरी बेट्स | ६० |
| १६) | नवीन कराराच्या "अंत:करणाचे" संक्षिप्त अध्ययन - होलीस मिल्लर | ६५ |
| १७) | आनंदीत असा - डालटन की | ६७ |
| १८) | प्रथम व शेवटचे - बॉब पलंकट | ६९ |
| १९) | आशीर्वाद - एडविन वाईन | ७१ |
| २०) | संतुष्ट असावे - सी.डब्ल्यू. ब्रेडली | ७३ |



# संपादकीय

**अमुल बनसोड**

परमेश्वराने आपल्याला केवळ निर्माण करून आपल्या जीवनात निश्चय करण्याचीच केवळ शक्ती दिलेली नसून आपल्या सर्वांसंबंधी असलेली त्याची इच्छा त्याने प्रकट केली आहे ही एक आशीर्वादाची गोष्ट आहे. आपले जीवन खरोखरच यशस्वी बनविण्यासाठी आणि जीवनातील खरा आनंद प्राप्त करण्यासाठी परमेश्वराची इच्छा जाणून घेवून त्याप्रमाणे कृती करणे आपल्याला गरजेचे किंवा जरूरीचे आहे. आज मनुष्य सर्वात मोठी एक चूक करीत आहे, ती म्हणजे तो पदव्या आणि व्यापार यामध्ये यशाचे गमक, खरे यश मानतो. प्रसन्नता आणि आनंद प्राप्तीसाठी विविध आधुनिक विजेवर चालणाऱ्या उपकरणांचा आणि यंत्राचा तो एक प्रकारे साठाच आपल्या स्वत:जवळ करीत आहे. मादक द्रव्यांमध्ये मनुष्य मन:शांती शोधण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु वास्तविक त्यांच्याजवळ काहीच नाही, आणि एक वास्तवकता ही देखील आहे की जो मनुष्य ह्या सर्व गोष्टींच्या शोधामध्ये, त्या मिळविण्याच्या खटपटीत राहतो, तो एक दिवस स्वत:ला देखील

हरवून बसतो. पवित्र शास्त्रातील एक लेखक एका गंभीर विषयाकडे आपल्या सगळ्यांचे लक्ष वेधू इच्छितो, तो अशाप्रकारे वचनाद्वारे सांगू इच्छितो की,

"देव अधार्मिकाचा उच्छेद करून प्राण हरण करील, तेव्हा त्याची काय आशा राहणार ?" (इयोब २७ : ८) प्रभू येशू ख्रिस्त देखील ह्या पृथ्वीवर असतांना लोकांना आपल्या वचनांद्वारे म्हणतो की, "मनुष्याने सर्व जग मिळविले आणि आपला जीव गमावला तर त्याला काय लाभ?" (मत्तय १६ :२६)

आजच ह्या गोष्टींकडे लक्ष देण्याची, त्यावर विचार करण्याची फार आवश्यकता आहे कारण आज माणसाने स्वत:चे जीवन इतके अधिक व्यस्त करून टाकले आहे की त्याच्या जीवनाचा मूळ उद्देश, त्याविषयी परमेश्वराचा काय उद्देश, इच्छा आहे ह्याविषयी विचार करण्यास त्याच्याजवळ वेळच नाही. आपल्या राहणीमानाचे स्टॅण्डर्ड वाढविण्यास तो दिवसरात्र मेहनत करीत असतो, मनोरंजनासाठी तासनतास टेलिव्हिजनसमोर किंवा सिनेमा बघण्यात तो गुंग असतो. भौतिक सामान्य ज्ञान वाढविण्यासाठी तो विविध मासिक आणि पुस्तकं वाचण्यात मग्न असतो, अशाप्रकारे प्रत्येक मनुष्य आज व्यस्त आहे, आणि तो खरोखरचं व्यस्त आहे, पण असा प्रश्न पडतो की जेव्हा आपलं स्वत:चं शरीर सोडून मनुष्य देवाजवळ जाईल तेव्हा कोणत्या आशेने जाईल ? काय देवाच्या स्वर्गीय राज्यात त्याला प्रवेश मिळेल?

निसंशय आज प्रत्येक व्यक्तीने एकच सिद्धांत अवलंबिला आहे, तो म्हणजे, "खा,प्या आणि आनंद करा कारण उद्या तर मरणेच आहेच." परंतु मृत्यूनंतर काय होईल ? ह्या गोष्टीवर तुम्ही कधी विचार केला काय? पवित्र शास्त्रात उपदेशक आपल्या वचनात म्हणतो की, "हे तरुणा आपल्या तारुण्यात आनंद कर, तुझ्या तारुण्याच्या दिवसात तुझे हृदय तुला उल्हास देवो, पण ह्या सर्वांबद्दल देव तुझा झाडा घेईल हे तुझ्या लक्षात असू दे." यासाठी "आपल्या तारुण्याच्या

दिवसांत आपल्या निर्माण कर्त्याला स्मर'' कारण ''सगळ्या बऱ्या वाईट गुप्त गोष्टींचा न्याय करितांना देव सगळ्या कृत्याची झाडाझडती घेईल'' (उपदेशक ११:९, १२:१, १४)

आज काही लोक परमेश्वराची खिल्ली उडवत म्हणत असतात की, कुठे आहे परमेश्वर ? कसा आहे, कोण आहे परमेश्वर ? ते सर्व परमेश्वराच्या न्यायाला एक गमतीची गोष्ट समजतात. परंतु अशाप्रकारे परमेश्वराची खिल्ली उडवणं ठिक नाही कारण पवित्र शास्त्र म्हणजे की मनुष्य जे काही पेरतो त्याचीच कापणी करील. आणि अशाप्रकारे जो कोणी आपल्या शरीराकरिता पेरणी करतो तो शरीराद्वारे विनाशाचीच कापणी करील पण जो आत्म्याकरिता पेरणी करतो, तो आत्म्याद्वारे अनंत जीवनाची कापणी करेल यासाठी ''फसू नका'' पवित्र शास्त्र सांगते,

''देवाचा उपहास व्हावयाचा नाही'' (गलती ६ : ७ -८)

नोहाच्या काळात ज्याप्रमाणे लोक भ्रमामध्ये होते, त्याप्रमाणे आज पुष्कळ लोक भ्रमात आहेत. काय त्या लोकांविषयी तुम्ही ऐकले आहे काय? ते फारच सांसारिक, (शारीरिक) लोक होते, त्यांना आपल्या आत्म्याची काहीच काळजी, चिंता नव्हती, ते आपल्या शारीरिक, भौतिक इच्छांना पूर्ण करण्यात मग्न होते. त्यांचे पाप येथपर्यंत वाढले होते की, परमेश्वराला पृथ्वीवर जलप्रलय पाठवून त्याचा नाश करावा लागला. परंतु परमेश्वराने याविषयी धार्मिक नोहा जवळ इच्छा प्रकट करून सांगितले होते की, ''मी तुला तुझ्या परिवारासमवेत वाचविलं.'' परमेश्वराच्या ह्या निर्णयाविषयी जलप्रलयाच्या पुष्कळ वर्ष आधीच नोहाने लोकांना अवगत केले होते, परंतु त्याच्यापैकी एकानेही आपले मन वळविले नाही आणि जेव्हा जलप्रलय आला तेव्हा ते सर्वच्या सर्वच त्यामध्ये विनाश पावले.

मित्रांनो, परमेश्वर आपल्या प्रतिज्ञेस कधीच विसरत नाही, त्यापासून फिरत नाही, परंतु त्याची इच्छा असते की,न्यायाचा दिवस

येण्याअगोदर प्रत्येकाला पश्चात्तापाची संधी मिळावी . (२ रे पत्र ३ : ९ ते ११) परमेश्वर, ज्याने मनुष्यांना निर्माण केले सर्व मनुष्यांवर अथांग प्रेम करतो आणि त्याच्या प्रेमाचं परिमाण आपल्याला त्याचा पुत्र प्रभू येशू ख्रिस्ताच्या मृत्यूद्वारे मिळतं, जो परमेश्वराच्या इच्छापूर्तीसाठी क्रुसावर मरण पावला होता. पवित्र शास्त्र सांगते की, येशू ख्रिस्ताच्या क्रुसखांबावरील मृत्यूद्वारे परमेश्वराने ह्या सृष्टीवर असलेले अद्‌भूत प्रेम प्रकट केले आहे. जरी येशू ख्रिस्ताच्या जीवनात काही पाप नव्हते, तो धार्मिक आणि निर्दोष होता, परंतु तरी देखील त्याने अपराध्याप्रमाणे क्रुसावर खिळण्यात येवून मरावं, असे परमेश्वराने घडू दिले. कारण त्याच्या मृत्यूद्वारे संपूर्ण जगाच्या पापांचे प्रायश्चित त्याने केले. ख्रिस्ताच्या ह्या मरणामध्ये परमेश्वराने जगावरील आपले प्रेम, दया आणि धार्मिकता प्रकट केली आहे. त्याच्या मृत्युद्वारे परमेश्वराने प्रत्येक मनुष्याला त्याजवर विश्वास ठेवून परमेश्वराशी संधी (मेळ) करून घेण्याचा अवकाश, अवधी दिला आहे. पापामुळे प्रत्येक मनुष्य परमेश्वरापासून वेगळा झाला आहे परंतु प्रभु येशू ख्रिस्ताद्वारे परमेश्वराशी पुन्हा जोडल्या जातो. जेव्हा आम्ही प्रभू येशूवर विश्वास ठेवून आपलं मन पापांपासून वळवून पापांच्या क्षमेसाठी बाप्तिस्मा घेतो, तेव्हाच हे शक्य होते. पवित्र शास्त्र आम्हाला सांगते,

''कारण पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे.'' (रोम ६:२३)

अर्थातच पाप मनुष्याला परमेश्वरापासून वेगळे करून नर्कामध्ये घेऊन जाते परंतु प्रभू येशू आपल्याला पापांपासून मुक्त करवून पुन्हा परमेश्वराकडे आणतो.

म्हणून, एका बाजूला पापामुळे नर्काचा अनंत मृत्यूदंड आहे, दुसऱ्या बाजूस प्रभू येशू मध्ये परमेश्वराच्या अनुग्रहामुळे स्वर्गीय अनंत जीवन आहे. ह्या दोहोपैकी कोणती गोष्ट आपण मिळवू इच्छितो,याचा विचार आपल्याला करायचा आहे आणि हा निर्णय आपल्या सगळ्यांना

आपल्यासाठी स्वत: करायचा आहे. आपण दोन्ही गोष्टी एकाच वेळी मिळवू शकत नाही. आपण पापामध्ये जीवन व्यतीत करून स्वर्गात प्रवेश मिळवू शकत नाही. जगिक गोष्टींवर प्रेम करू शकत नाही. मग आम्ही काय म्हणावे? पवित्र शास्त्रातील एक लेखक सांगतो की, ''तर आता आपण काय म्हणावे? कृपा वाढावी म्हणून आपण पापात रहावे काय? कधीच नाही! जे आपण पापाला मेलो ते आपण ह्यापुढे त्यात कसे राहणार? किंवा आपण जितक्यांनी ख्रिस्त येशूमध्ये बाप्तीस्मा घेतला तितक्यांनी त्याच्या मरणात बाप्तीस्मा घेतला, ह्याविषयी तुम्ही अजाण आहा काय? तर मग आपण त्या मरणातील बाप्तीस्म्याने त्याच्याबरोबर पुरलो गेलो, ह्यासाठी की, ज्याप्रमाणे ख्रिस्त पित्याच्या गौरवाने मेलेल्यातून उठला त्याचप्रमाणे आपणही नवीन प्रकारच्या जीवनात चालावे. कारण जर आपण त्याच्या मरणाच्या प्रतिरूपाने त्याच्याशी संयुक्त झालो आहे तर त्याच्या उठण्याच्याही प्रतिरूपाने त्याच्याशी संयुक्त होऊ. हे आपल्याला ठाऊक आहे की, हे पापाच्या अधीन असलेले शरीर नष्ट होऊन आपण  ह्यापुढे पापाचे दास्य करू नये, म्हणून आपल्यातील जुना मनुष्य त्याच्याबरोबर वधस्तंभावर खिळला गेला.''

''म्हणून तुम्ही आपल्या शरीर वासनांच्या अधीन न व्हावे म्हणून पापाने तुमच्या मर्त्य शरीरात राज्य करू नये आणि तुम्ही आपले अवयव अनीतिची साधने होण्याकरिता पापाला समर्पण करीत राहू नका, तर मेलेल्यातून जिवंत झालेले असे स्वत:स देवाला समर्पण करा आणि आपले अवयव नीतिची साधने होण्याकरिता देवाला समर्पण करा.'' (रोम ६:१ ते ६, १२ ते १३)

हे असं जीवन आहे मित्रांनो, जे परमेश्वराच्या इच्छेनुसार आहे. तो इच्छितो की, आपण सर्वांनी आपलं जीवन प्रभू येशू ख्रिस्तामध्ये व्यतीत करावे. आपल्यापैकी कुणाही व्यक्तीने आपलं जीवन पापामध्ये व्यतीत करावं,अशी त्याची इच्छा नाही. धार्मिकतेचं ते नवीन जीवन

देण्यासाठी परमेश्वराने एक मोठं बलिदान दिलं आहे, त्याने आपल्या निर्दोष, निष्पाप पुत्राला आपल्या पापाचे प्रायश्चित्त म्हणून आपल्यासाठी बलिदान केले. त्याला आमच्या जीवनांविषयी चिंता आहे, कारण तो आमच्यावर प्रेम करतो आणि पापामुळे आमचा नाश व्हावा, अशी त्याची इच्छा नाही.

परंतु आपण आपल्या जीवनासोबत आज काय करतो आहोत ? कोणत्या दिशेने, मार्गाने आम्ही जात आहोत ? आपण आपल्या विचारांना आणि मार्गांना बदलायला पाहिजे. ह्या जगातून कायमसाठी उचलल्या जाण्याआधी ह्या गोष्टींचा निर्णय घेणे आपल्यासाठी जरूरीचे आहे की, त्या अनंत काळामध्ये आपण कोठे राहू ? जर परमेश्वरासोबत आपण अनंतकाळात राहू इच्छितो तर त्याच्या आज्ञा पाळून त्याच्याशी जवळीक करणे आजचं आपल्याला आवश्यक आहे. पृथ्वी वरील वस्तूंवरून आपले लक्ष बाजूला सारून आपला विश्वास परमेश्वरावर ठेवावा आणि त्याच्या आज्ञा पाळणे आवश्यक आहे.

वास्तविक परमेश्वराच्या इच्छेनुसार चालण्यानेच जीवनात मनुष्याला आनंद प्राप्त होऊ शकतो, कारण परमेश्वराच्या इच्छेनुसार जीवन व्यतीत करताना मनुष्य हे जाणतो की तो जे काही करतो, परमेश्वर त्याचा स्वीकार करीलच. त्यामध्ये मनुष्याला कसलीही भीती नसते आणि लाज देखील नसते. पण जे काही तो करतो, पूर्ण आनंदाने करतो. अशाच प्रकारे, खरी शांती मनुष्याला जगिक वस्तुंमध्ये मिळू शकत नाही. संसारिक संपत्ती वाढविणं म्हणजे वास्तविक आपल्यावर दु:खाचे ओझं वाढविणे, परंतु खरी शांती मनुष्याला तेव्हाच प्राप्त होते जेव्हा त्याला ज्ञात होते की, परमेश्वराने त्याच्या सर्व पापांची क्षमा केली आहे आणि आता तो आपल्या परमेश्वराला भेटण्यासाठी तयार आहे.

म्हणून, जर तुम्ही परमेश्वराची इच्छा जाणून त्याचा पुत्र प्रभू

येशू ख्रिस्त याजकडे याल आणि त्याच्या आज्ञा पाळालं, आणि त्याच्या जीवनाचं पालन कराल, आचरण कराल, तर तो तुमच्या जीवनाला एक नवीनजीवन बनविल. कारण तो तुमचे जीवन तुम्हांपासून घेऊन स्वत:च जीवन तुम्हाला देईल. केवळ तेव्हाच आपल्याजवळ ज्यात संतोष, समाधान, आनंद आणि शांती व आशा असेल असं जीवन असेल.

ooo

आज मनुष्य सर्वात मोठी एक चूक करीत आहे, ती म्हणजे तो पदव्या आणि व्यापार यामध्ये यशाचे गमक, खरे यश मानतो. प्रसन्नता आणि आनंद प्राप्तीसाठी विविध आधुनिक विजेवर चालणाऱ्या उपकरणांचा आणि यंत्राचा तो एक प्रकारे साठाच आपल्या स्वत:जवळ करीत आहे. मादक द्रव्यांमध्ये मनुष्य मन:शांती शोधण्याचा प्रयत्न करत आहे.

# आम्ही कोणाची उपासना करावी

**जे.सी. चोट**

मनुष्याने जगाच्या निर्मितीपासून सूर्याखाली असणाऱ्या सर्व वस्तूंची उपासना केली आणि प्रत्यक्ष सूर्याची देखील उपासना केली. या जगात संसारात लाखो देवी आणि देवता आहेत. त्यांच्या भक्तांनी अनेक मंदिरे बनविली तरीही बहुतेक लोक आपल्या धर्माबद्दल असंतुष्ट आहेत का? काय उणीव आहे.

उणीव ही आहे की, असंख्य लोक असे आहेत की ज्यांचा विश्वास एकमेव खऱ्या व जिवंत परमेश्वरावर नाही. कारण ''देव



आत्मा आहे आणि त्यांच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिज'' (योहान ४:२४)

म्हणून मनुष्याने परमेश्वराची उपासना करायला पाहिजे. जेव्हा मनुष्य ही गोष्ट समजून शिकून त्याचीच उपासना करेल त्याचवेळी त्याला आत्मीक शांती व सुख मिळू शकते ज्याचा तो शोध करीत आहे.

**१) परमेश्वर सर्व वस्तूंचा निर्माणकर्ता आहे प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली (उत्पत्ती १ :१) -**

या ठिकाणी कोणी तर्क करून म्हणू शकतो की हे तर बायबल (पवित्र शास्त्रा) मध्ये लिहिले आहे. पण याचे प्रमाण काय ?आपल्या सभोवतालच्या सर्व वस्तू पाहा.ज्या परमेश्वराने बनवलेल्या आहेत. पृथ्वी आणि पृथ्वीवरील सर्व वस्तू परमेश्वराचे अस्तित्व असल्याचे आढळते.

**२) परमेश्वराने आपला पूत्र येशू ख्रिस्त यास पापा पासून मनुष्याचे (उद्धार) तारण करण्यासाठी पाठविले -**

प्रभूच्या येण्याच्या उद्देशासंबंधी आम्ही असे वाचतो, ''देवाने जगावर एवढी प्रीती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला. यासाठी की, जो कोणी त्याजवर विश्वास ठेवितो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. देवाने पुत्राला जगाचा न न्यायनिवाडा करण्यासाठी नाही, तर त्याच्याद्वारे जगाचे तारण व्हावे म्हणून पाठविले. (योहान ३ : १६ -१७) पौल लिहितो, ''परंतु देव आपल्यावरच्या स्वप्रेमाचे प्रमाण हे देतो की, आपण पापी असता ख्रिस्त आपणासाठी मरण पावला (रोम ५ :८) तसेच तो म्हणतो, ''हे आपला तारणारा देव याच्या दृष्टीने चांगले व स्वीकारावयास योग्य आहे. त्याची इच्छा आहे की, मनुष्यांचे तारण व्हावे व त्यांनी सत्याच्या पूर्ण ज्ञानास पोहचावे.'' (१ तीमथ्थी २ :३-४) आमच्या तारणासंबंधी तो लिहितो व सांगतो की, ''तुमचे तारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे झाले आहे आणि हे तुमच्या हातून झाले नाही तर हे देवाचे दान आहे. कोणी आढ्यता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने हे झाले नाही

(इफिस२:८-९)

**३) देवाने आम्हाला सर्व प्रकारचे शारीरिक आणि आत्मिक आशीर्वाद दिले :**

याकोब म्हणतो, ''प्रत्येक उत्तम देणगी व प्रत्येक पूर्ण दान वरून आहे. ते ज्याला विकार नाही व जो फिरण्याने छायेत जात नाही अशा प्रकाशाच्या पित्यापासून उतरते (याकोब १:१७) आणि पौल म्हणतो, ''आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा पिता जो देव तो धन्यवादित असो. त्याने स्वर्गातील सर्व आध्यात्मिक वर देऊन आपणाला ख्रिस्तामध्ये धन्य केले आहे.' (इफिस १:३)

**४) एकच खरा जिवंत देव आहे :**

त्या एकमेव देवाविषयी पौल म्हणतो,''एक देव सर्वांचा पिता, तो सर्वांवर असून सर्वव्यापी व सर्वामध्ये आहे.''(इफिस ४:६) त्याचप्रमाणे तो पुढे म्हणतो,''कारण एकच देव आहे, आणि देव व मनुष्ये यामधील ख्रिस्त येशू हा मनुष्य एकच मध्यस्थ आहे. (१ तिमथ्थी २ :५)

**५) देव आत्मा आहे :**

याविषयी आपण पहिलेच योहान ४ :२४ मध्ये पाहिले आहे त्या ठिकाणी स्पष्ट सांगितले आहे की देव आत्मा आहे. दुसऱ्या शब्दांत परमेश्वर मास व रक्त नाही तो शारीरिक किंवा नाशवंत नाही तसेच तो भौतिक नाही. यामुळे जेव्हा आम्ही ही गोष्ट समजतो की तो आत्मा आहे. त्यावेळी देवाविषयी आमचा योग्य दृष्टिकोन असू शकतो. कारण त्यावेळी आम्ही देवाला मनुष्यासमान न पाहता एका वेगळ्या व उंच पातळीवर पाहतो.

**६) देव प्रीती आहे :**

याविषयी योहान लिहितो की, ''जो प्रीती करीत नाही तो देवाला ओळखीत नाही. कारण देव प्रीती आहे. देवाने आपल्या एकुलत्या एक पुत्राला जगात पाठविल आहे. ह्यासाठी की, त्याच्याद्वारे आपणास जीवन प्राप्त व्हावे; ह्यावरून देवाची आपल्यावरील प्रीती प्रगट झाली. प्रीती म्हणावी तर हीच आपण देवावर प्रीती केली असे नाही

तर त्याने तुम्हा आम्हावर प्रीती केली आणि तुमच्या आमच्या पापाचे प्रायश्चित व्हावे म्हणून स्वपुत्राला पाठविले. प्रियजनहो देवाने जर आपल्यावर अशा प्रकारे प्रीती केली तर आपणही एकमेकांवर प्रीती केली पाहिजे. (१ योहान ४ :८-११) म्हणून तो म्हणतो जर आमच्या ठायी प्रीती नाही तर आम्ही देवाला ओळखत नाही. कारण देवाने स्वत:ला प्रीतीनेच प्रगट केले आहे. फार मोठे प्रमाण आहे. कोणत्या एका वस्तूशिवाय कोणती दुसरी वस्तू बनू शकत नाही. यास्तव जर काही आहे तर त्याला कोणीतरी बनवले आहे. दाविद म्हणतो, ''आकाश देवाचा महिमा वर्णिते. अंतरिक्ष त्याची हस्तकृती दर्शविते. (स्तोत्र १९:१) या गोष्टीचा विरोध कोण करू शकतो? याचा विरोध कोण करेल ?

परमेश्वराने मनुष्याला आपल्या प्रतिस्वरूपाचा बनविले ''मग देव बोलला आपल्या प्रतिरूपाचा व आपल्याशी सदृश असा मानव आपण करू समुद्रातील मत्स, आकाशातील पक्षी, पशू, अवधी पृथ्वी आणि पृथ्वीवर संचार करणारे सर्व जीव यावर ते सत्ता चालवितील. देवाने आपल्या प्रतिरूपाचा मनुष्य निर्माण केला. देवाचे प्रतिरूप असा तो निर्माण केला. नर व नारी अशी ती निर्माण केली (उत्पत्ती १:२६-२७) ''मग परमेश्वर देवाने जमिनीतील मातीचा मनुष्य घडीला व त्याच्या नाकपुड्यात प्राणवायू फुंकिला तेव्हा मनुष्यय जीवधारी प्राणी झाला. (उत्पत्ति २ :७)

ooo

याकोब म्हणतो, ''प्रत्येक उत्तम देणगी व प्रत्येक पूर्ण दान वरून आहे. ते ज्याला विकार नाही व जो फिरण्याने छायेत जात नाही अशा प्रकाशाच्या पित्यापासून उतरते

**(याकोब १:१७)**

# उपासना

जेरी बेट्स



उपासना याचा अर्थ असा होतो की, सेवा (दास), स्तुति (प्रशंसा) सन्मान (आदर) गौरव (महिमा) व भक्ती, उपासना ही खऱ्या प्रकारे होण्यासाठी एक चांगल्या व्यक्तीद्वारे होण्याची गरज आहे. ती खऱ्या मनापासून केली पाहिजे.

१) आम्ही सेवेच्या द्वारे उपासना करू शकतो -

या ठिकाणी सेवा याचा अर्थ आहे मदत करणे, आज्ञा पाळणे, काम करणे, आराधना करणे इत्यादी व परमेश्वराच्या मुलांविषयी बायबल सांगते की, एक दास आहे आणि त्याचा स्वामी प्रभू आहे. अनेक वेळा पौलस स्वत: प्रभूचा दास म्हणून घेतो, संबोधित करतो.

(रोम १:१) पेत्र व याकोब यांनी पण २ पेत्र १:१ व याकोब १:१ मध्ये सुद्धा स्वत:ला प्रभू येशू ख्रिस्ताचा दास म्हणून संबोधित केले. याचा अर्थ काय? सर्व काही प्रभूला ख्रिस्ताला समर्पित करून त्याची सेवा करीत राहणार आणि तसेच आम्हाला पण करायचे आहे. पौलस एका ठिकाणी म्हणतो की, ''परंतु आता तुम्ही पापापासून मुक्त होऊन देवाचे दास झाल्यामुळे तुम्हास पवित्रीकरणाची फलप्राप्ती झाली आहे आणि सर्वकालचे जीवन हे उद्दिष्ट मिळाले आहे.'' (रोम ६:२२)

**आता ही गोष्ट पाहण्याकरिता प्रभूला कोणत्या प्रकारची सेवा पाहिजे खालील वचनावरून पाहू या.**

प्रेषित २० : १९ - रोम १४:१६-१९, रोम १२:११, रोम १२:१, इफिस ६:७ प्रगटी २:१९.

तर आम्ही उपासनेला, उपासनेची सेवा म्हणून संबोधित करतो तर ते खरे आहे कारण आपण प्रभूची सेवा करत आहो. दुसऱ्या शब्दात आमचे संपूर्ण जीवन प्रभूच्या सेवेत व्यतीत होत आहे आणि अशाप्रकारे आमचे संपूर्ण जीवन त्याच्या उपासनेत व्यतीत होत आहे आणि जर आम्ही त्याच्या आज्ञेप्रमाणे चालत नाही तर आम्ही कसे म्हणू शकतो की आम्ही त्याची उपासना करत आहे.

आम्ही स्तुतीच्या द्वारे प्रभूची उपासना करू शकतो. प्रे.कृ. १६:२५ जेव्हा पौलस व सीलास बंदिगृहात होते तेव्हा असे लिहिले, ''मध्य रात्रीच्या सुमारास पौल व सीला हे प्रार्थना करीत असता व गाणे गाऊन देवाची स्तुती करीत असता बंदिवान त्याचे ऐकत होते. पुन्हा एका वचनात लिहिले आहे की, प्रभूने आम्हाला किती आशीर्वादीत केले आहे आणि त्याच्या प्रती आमचे काय कर्तव्य आहे. पौल म्हणतो की, ''ह्यासाठी की, ज्या आम्ही ख्रिस्तावर पूर्वीच आशा ठेविली होती त्या आम्हाकडून त्याच्या गौरवाची स्तुती व्हावी'' इफिस १:१२. मग आम्ही असे वाचतो की, ''म्हणून त्याचे नाव पत्करणाऱ्या 'ओठांचे फळ' असा स्तुतीचा यज्ञ आपण त्याच्याद्वारे नित्य अर्पण करावा (इब्री

१३:१५). पेत्र अशाप्रकारे लिहितो की, ''ह्यासाठी की नाशवंत सोन्याची परीक्षा अग्नीने करितात त्या सोन्यापेक्षा मूल्यवान असे जे तुमचे विश्वासाच्या परीक्षेत उतरेण ते येशू ख्रिस्ताच्या प्रगट होण्याच्या वेळेस प्रशंसा गौरव व मान ह्यांस कारणीभूत व्हावे. (१ पेत्र १ :७)

भाषण करणाऱ्याने आपण देवाची वचने बोलत आहो असे बोलावे. सेवा करणाऱ्याने ती आपण देवाने दिलेल्या शक्तीने करीत आहो अशी करावी. ह्यासाठी की, सर्व गोष्टीत देवाचे गौरव येशू ख्रिस्ताच्या द्वारे व्हावे. गौरव व पराक्रम ही युगानुयग त्याची आहेत. आमेन (१ पेत्र ४:११).

आम्हाला प्रभूची स्तुती प्रत्येक दिवशी आपल्या कामाद्वारे, बोलण्या चालण्याद्वारे करायला पाहिजे. विशेष करून प्रभूच्या उपासनेच्या दिवशी आम्ही एकत्र होतो तेव्हा आमचा उद्देश असायला पाहिजे की, आम्ही त्याची स्तुती करू. आमच्या उपस्थितीद्वारे आम्ही स्तुती आणि जेव्हा आम्ही उपासनेसाठी एकत्र येवू त्यावेळेस आम्ही नम्रतेने यायला पाहिजे तसेच शास्त्रअभ्यास करणे, प्रार्थना करणे, गीत गाणे, वर्गणी देणे आणि प्रभू भोजणात भाग घेण्याद्वारे आम्ही त्याची स्तुती करू शकतो, प्रशंसा करू शकतो आणि जर असे आम्ही करत नाही तर कशाप्रकारे आम्ही प्रभूची स्तुती करणार ?

**आम्ही प्रभूचा (आदर) सन्मान करून त्याची उपासना करू शकतो -**

योहान ५:२३ मध्ये प्रभू येशूने असे म्हटले, ''ह्यासाठी की, जसा पित्याचा सन्मान करितात त्या पुत्राचाही सन्मान सर्वांनी करावा जो पुत्राचा सन्मान करीत नाही.'' तो ज्याने मला पाठविले, त्या पित्याचा सन्मान करीत नाही. तसेच आपण पाहू शकतो की, (१ पेत्र १ :७) ''ह्यासाठी की नाशवंत सोन्याची परीक्षा मूल्यवान असे जे तुमचे विश्वासाच्या परीक्षेत उतरणे ते येशू ख्रिस्ताच्या प्रगट होण्याच्या वेळेस प्रशंसा, गौरव व मान ह्यास कारणीभूत व्हावे.'' तसेच पौल लिहितो

(१तिमथी १:१७) जो सनातन, अविनाशी अदृश्य राजा असा एकच देव त्याला सन्मान व गौरव युगानुयग असो, आमेन. आम्हाला प्रभूचा सन्मान करावयाचा आहे. कारण त्याने आमचा उद्धार केला, आम्हाला आशीर्वादीत केले व एक चांगले उत्तम जीवन जगण्याची आशा दिली म्हणून त्याचा सन्मान करू या.

**आम्ही त्याचे गौरव (महिमा) करून त्याची उपासना करू शकतो -**

गौरव करणे याचा अर्थ होतो की, मोठेपणा देणे, आदर करणे, सन्मान करणे, स्तुती करणे याचा अर्थ असा की उपासना करणे जे की आपण सुरूवातीलाच पाहिले (रोम १५:६) आता तुम्ही एकतेने व एकमुखाने आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा जो पिता आणि देव त्याचे गौरव करावे म्हणून धीर व उत्तेजन देणारा देव असे करो की ख्रिस्त येशूप्रमाणे तुम्ही परस्पर एकचित व्हावे.

(१ ले करिंथ ६:२०) मध्ये असे म्हटले आहे, ''कारण तुम्ही मोलाने विकत घेतलेले आहा. ह्यास्तव तुम्ही आपल्या शरीराने देवाचे गौरव करा.

(१ ले पेत्र ४:१६) ख्रिस्ती या नात्याने कोणाला दु:ख सहन करावे लागत असेल तर त्याला लाज वाटू नये त्या नावामुळे देवाचे गौरव करावे.

आपल्या जीवनात अशीच इच्छा असायला पाहिजे की, स्वत:ची स्तुती व मोठेपणा विसरून आपण प्रत्येक गोष्टीत परमेश्वराला उंचवयाला पाहिजे. त्याची स्तुती व गौरव करून त्याच्या तुलनेत आम्ही धूळ आहो, माती आहोत तरी प्रभू वारी आम्ही अशासाठी एकत्रित जगतो की आम्ही आमची मने पूर्णपणे त्याच्याकउे लावून त्याची उपासना करावी.

**आम्ही प्रभूची उपासना त्याच्या प्रती आपल्या भक्तीद्वारे प्रकट करू शकतो -**

परमेश्वर आमचा निर्माणकर्ता व प्रभू येशू ख्रिस्त आमचा उद्धारकर्ता आहे. आम्ही त्याचे ऐकायला पाहिजे. आम्हाला त्याच्या आज्ञा पाळल्या पाहिजे. लीनतेने व नम्रतेने आम्ही त्याची भक्ती केली पाहिजे. कारण दाविद लिहितो, ''त्याचे नाम पवित्र व भययोग्य आहे.'' (स्तोत्र १११:९)

तरी खरे उपासक आत्म्याने व खरेपणाने पित्याची उपासना करतील अशी वेळ येत आहे. किंबहुना आलीच आहे, कारण आपले उपासक असे असावे अशीच पित्याची इच्छा आहे. (योहान ४:२३)

''देव आत्मा आहे आणि त्याच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे. योहान ४:२४, परंतु आपल्या मनाने व आत्म्याने तेव्हा भक्ती करू शकतो, जेव्हा आम्ही खऱ्या अंतकरणाने लीन नम्र होवून मनापासून त्याची उपासना करतो. तेव्हा आम्ही पौलाने सांगितलेली गोष्ट चांगल्याप्रमारे समजू शकतो की, ''बोलणे किंवा करणे जे काही तुम्ही कराल ते सर्व प्रभूच्या नावाने करा आणि त्याच्याद्वारे देव जो पिता त्याची उपकारस्तुती करा.'' (कलस्सै ३:१७)

अनेक लोक उपासनेला अशा करिता जातात की ती त्याची सवय पडलेली असल्यामुळे काही लोक उपासनेच्या नियमाचे पालन करावे लागते म्हणून मंडळीत येतात किंवा आपणाला कोणीतरी सांगतात किंवा बोलतात म्हणून उपासनेला जातात पण त्यांना उपासनेचा अर्थ समजेला नसतो पण अशामुळे त्यापासून त्यांना काहीच लाभ होत नाही.

पण आता आपण जेव्हा उपासना करणार तर संपूर्ण मनाने स्वच्छ अंत:करणाने, लीन व नम्र भावनेने खऱ्या मनाने परमेश्वराची उपासना करून देवाला मान, महिमा, गौरव व स्तुती देऊ या.

ooo

# मला सुवार्तेची लाज वाटत नाही

**फ्रान्सिस डेविड**

मित्रांनो, तुम्ही कधी ह्या गोष्टीवर विचार केला आहे का ? कि मी पुन्हा पुन्हा या रेडिओच्या माध्यमातून तुम्हाला मसीहा, ख्रिस्ताची सुवार्ता का सांगत आहे? आज अंदाजे पंचवीस वर्षाहूनही अधिक वर्ष झाली आहेत तरी आजही मी तुम्हाला तीच सुवार्ता सांगत आहे. जी सुवार्ता मी तुम्हाला पंचवीस वर्षापूर्वी सांगितली होती. वास्तविक पाहता जी सुवार्ता मी तुम्हाला पंचवीस वर्षापासून सांगत आहे ती दोन हजार वर्षापूर्वीची आहे. मागील दोन हजार वर्षामध्ये हजारो आणि लाखो लोकांनी ह्याच सुर्वातेचा संपूर्ण जगामध्ये प्रसार केला आहे. आणि आज सुद्धा करत आहे आणि आजही लाखो आणि करोडो लोकांनी ही सुवार्ता ऐकून त्यावर विश्वास ठेवला आहे आणि हे संपूर्ण जगाने मान्य केले. परंतु का ह्या सुर्वातेचा प्रसार केला जात आहे?

तुम्हाला माहिती आहे काय? की ह्या पंधरा मिनिटाच्या कार्यक्रमासाठी रेडिओ माध्यमातून तुम्हापर्यंत प्रसारित करण्याकरिता काही हजार रुपये खर्च होतो? परंतु ही धनसंपत्ती कोठून येते? आपल्यासारखे अनेक गरीब लोक, पुष्कळ विधवा आणि लहान-सहान

काम करणारे लोक ज्यांनी समाजामध्ये इकडून-तिकडून ही सुवार्ता ऐकून तिला मान्य केले. तेच लोक ह्या सुवार्तेला दुसऱ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी आपल्या मिळकतीतून काही ना काही ह्या सुवार्तेच्या प्रसारासाठी पैशांची मदत करीत आहे. परंतु ते लोक असं का करीत आहेत? एवढ्या साऱ्या पैशांनी गरीब लोकांना अन्न, वस्त्र व निवारा हे नाही देवू शकत का ? की ह्या पैशांनी दुष्कळसे दवाखाने आणि शाळा काय आपण उघडू शकत नाही काय? होय, ह्याप्रमाणे पैसा एकत्र करून ह्याप्रकारे पुष्कळसे दान-धर्माचे काम करू शकतो. परंतु प्रश्न हा आहे की काय ह्या प्रकारचे कामे करून कोणत्याही एक आत्म्याला नरकाच्या शिक्षेपासून त्याला वाचवू शकते काय?

परमेश्वराच्या वचनाच्या पुस्तकामध्ये म्हणजेच बायबलमध्ये एका ठिकाणी आपण ह्या प्रकारे वाचतो की जेव्हा एकदा येशू ख्रिस्त जात होते तेव्हा ते जाता-जाता त्याच्यामागे खूप लोक येत हाते. त्या सर्वांना येशूने वचने सांगितली आणि नंतर येशू आपल्या शिष्यगणांना म्हणाले, "ह्या लोकांना खावयास द्या. परंतु शिष्यांनी ही आज्ञा ऐकताच ते थक्क झाले कारण की ते लोक पाच हजारापेक्षाही जास्त होते, पण त्या लोकांच्या गर्दीमध्ये एक मुलगा होता. तो कामाला जाण्यासाठी घरातून निघाला असावा. त्या मुलाजवळ जेवण्यासाठी पाच भाकरी आणि दोन मासळ्या होत्या. प्रभू येशूने त्या मुलाजवळचे ते जेवण घेतले आणि आपल्या शिष्यांना आज्ञा केली की लोकांना जेवायला बसवा आणि प्रभू येशूने आकाशाकडे वर पाहून त्या भाकरीवर आशीर्वाद मागितला आणि देवाचे उपकार मानले आणि नंतर त्या भाकरी व मासळ्या शिष्यांना दिल्या आणि सांगितले लोकांना खावयास द्या आणि आश्चर्याची गोष्ट ही आहे की ते भोजन वाटत जात होते आणि लोक ते खात होते आणि लोक खावून तृप्तपण झाले तरीही त्या पाच भाकरी व दोन मासळ्या संपल्या नाहीत तर जेवण संपल्यानंतर शिष्यांनी भाकरीने भरलेल्या बारा टोपल्या जमा केल्यात. ज्या लोकांनी

ते प्रात्यक्षिक पाहिले त्यांना खूपच आश्चर्य वाटले आणि ते सर्व लोक प्रभू येशूचे आभार मानणार होते. परंतु त्यांच्या आभाराची प्रभूला आवश्यकता नव्हती म्हणून ते त्या ठिकाणाहून निघून गेले.

परंतु ह्या गोष्टीची समाप्ती येथेच होत नाही आणि समोर असे लिहिले की जेव्हा दुसरा दिवस आला तेव्हा सर्व लोक प्रभू येशूला शोधू लागले आणि ज्यावेळी प्रभू येशू त्यांना दिसले तेव्हा लोकांनी प्रश्न केला. आम्ही तुमचा शोध करीत होतो. तुम्ही कोठे गेले होते ? परंतु प्रभुला माहिती होते की ते लोक का आपला शोध घेत आहे म्हणून प्रभूनी त्यांना उत्तर देतांना म्हणाले की, ''नाशवंत अन्नासाठी श्रम करू नका; तर पिता जो देव ह्याने ज्याच्यावर शिक्का मारला आहे. मनुष्याचा पुत्र तुम्हाला सार्वकालीक जीवनासाठी टिकणारे अन्न देईल त्यासाठी श्रम करा. (योहान ६:२७)

मित्रांनो, ह्या गोष्टीवर लक्ष द्या की प्रभूने त्यांना नंतर जेवायला दिले नाही तर त्यांना उपदेश करून सांगितले की, तुम्ही पृथ्वीवरील शारीरिक अन्नाविषयी चिंता करणे सोडून द्या तर सार्वकालीक जीवनासाठी टिकणारे अन्न मिळवण्याची खटपट (प्रयत्न) करा. कारण पृथ्वीवरील शारीरिक अन्न हे नाशवंत आहे पण वास्तविक पाहता मनुष्याला त्या सार्वकालीक अन्नाचीच आवश्यकता आहे. जे अन्न स्वर्गीय आहे ते अन्न आत्म्यासाठी आहे आणि ते अन्न आत्मिक आहे. परंतु जोपर्यंत मानवाचा प्रश्न आहे तो तर केवळ त्याच गोष्टीचा शोध करतो आणि केवळ त्याच गोष्टी प्राप्तीसाठी झटत असतो आणि त्याच गोष्टीवर मन लावतो की ज्या शारीरिक आहे. मनुष्याचे लक्ष तर त्याच अन्नाला प्राप्त करण्यासाठी असते, ज्या अन्नाद्वारे आपल्या शरीराला शक्ती प्राप्त होते. त्याचे लक्ष केवळ शारीरिक आरोग्याकडे लागलेले असते. त्याला आत्म्याची काहीच चिंता नाही कारण तो आपल्या आत्म्याविषयीचे महत्त्व ओळखत नाही. परंतु परमेश्वराने ज्या मनुष्याला

बनवले आहे ज्याने मनुष्याला जीवन दिले आहे तो ही गोष्ट पूर्णपणे जाणतो की मनुष्याचे शरीर हे नाशवंत आहे पण त्याचा आत्मा अमर आहे. ह्यासाठी त्याला मनुष्याच्या शरीराची एवढी नाही परंतु आत्म्याची काळजी आहे. मनुष्याच्या शरीरासाठी परमेश्वराने वेगवेगळे अन्नसामग्री बनवली आहे. परंतु मनुष्याच्या आत्म्याला पापामुळे नरकात जावून नाश होण्यापासून वाचवण्यासाठी त्याने आपल्या स्वत:च्या सामर्थ्यवान वचनाला एका मनुष्य रूपात जगामध्ये पाठवावे लागले आणि तो मनुष्य म्हणजे येशू ख्रिस्त होता. प्रभूने स्वत: म्हटले की देवाने जगावर एवढी प्रिती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला अशासाठी की जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होवू नये तर त्याला सार्वकालीक जीवन प्राप्त व्हावे (योहान ३:१६). देवाने आपल्या एकुलत्या एक पुत्राला क्रूसावर एका अपराध्याप्रमाणे मरण्यासाठी पाठवले होते आणि जेव्हा परमेश्वराकडून वेळपूर्ण झाली तेव्हा परमेश्वराने होवू दिले की त्याचा पुत्र निर्दोष असताना एका अपराध्याप्रमाणे धरल्या जावा आणि खोट्या साक्षीदारांनी दोष आरोप करून त्याला (अपराधी) दोषी ठरवावे आणि त्या समयानुसार एका क्रुसावरती टांगून मारावे. जेव्हा हे काम परमेश्वराच्या इच्छेनुसार झाले तेव्हा मेलेला येशूला कबरेमध्ये पुरल्या गेले पण हे असंभव होते की परमेश्वराचा पुत्र मनुष्यासारख्या कबरेमध्ये पुरून राहणे. म्हणून परमेश्वराच्या सामर्थ्याने तो तिसऱ्या दिवशी जिवंत झाला आणि स्वर्गारोहणापूर्वी त्याने आपल्या शिष्यांना ही आज्ञा दिली होती की, तुम्ही जावून संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा की, माझ्या बलीदानामुळे संपूर्ण जगाच्या पापाचे प्रायश्चित्त केले आहे आणि जो ऐकून विश्वास ठेवील आणि पश्चात्ताप करील आणि आपल्या पापाची क्षमा होण्यासाठी बाप्तीस्मा घेईल त्याला त्याच्या पापापासून मुक्तता आणि तारण मिळेल. (मत्तय २८:१९-२० मार्क १६:१५-१६, लुक २४:४६-४७, प्रेषित २:३७-३८)

आणि हेच कारण आहे मित्रहो की एकवेळेस पुन्हा मी आपल्याला तीच सुवार्ता सांगत आहे. कारण मला माहीत आहे की, आपल्याला आणि साऱ्या जगाला ह्याची गरज आहे. पण न केवळ सुवार्ता ऐकणेच जरूरी आहे. हे पण आवश्यक आहे की ऐकणाऱ्याने त्यावर विश्वास ठेवावा आणि तिला मान्य करावे आणि माझी इच्छा आहे की तुम्ही असेच कराल. कारण जेव्हा परमेश्वराने एक असे विशाल कार्य केले आहे तर काय आम्ही त्याच्या अनुग्रहाला व्यर्थ ठरवावे?

०००

आम्ही तुमचा शोध करीत होतो. तुम्ही कोठे गेले होते? परंतु प्रभुला माहिती होते की ते लोक का आपला शोध घेत आहे म्हणून प्रभूनी त्यांना उत्तर देतांना म्हणाले की, ''नाशवंत अन्नासाठी श्रम करू नका; तर पिता जो देव ह्याने ज्याच्यावर शिक्का मारला आहे. मनुष्याचा पुत्र तुम्हाला सार्वकालीक जीवनासाठी टिकणारे अन्न देईल त्यासाठी श्रम करा. (योहान ६:२७)

# ख्रिस्ती बनल्यानंतर

रॉइस फ्रेड्रिक



आज मी आपल्याला ह्याविषयी सांगू इच्छितो की, जेव्हा कोणी एखादा व्यक्ती ख्रिस्ती म्हणजेच येशू ख्रिस्ताचा अनुयायी बनतो तेव्हा काय होते. आता ह्या गोष्टीवर लक्ष द्या की मी इथे हे म्हणत नाही की, जेव्हा कोणी एक ''ख्रिस्ती बनवल्या जातो'' परंतु मी हे सांगतो की, जेव्हा कोणी व्यक्ती एक ख्रिस्ती बनतो कारण वास्तविकपणे कोणत्याही मनुष्याला एक ख्रिस्ती बनवल्या जावू शकते. पण प्रत्येक मनुष्याकडे स्वत: आपल्या इच्छेने पश्चात्ताप करून किंवा मन फिरवून परमेश्वराच्या मार्गावर चालण्यासाठी ख्रिस्ती बनतो. प्रभू येशू ख्रिस्ताने म्हटले होते की मार्ग, सत्य व जीवन मीच आहे आणि माझ्या वाचून पित्याजवळ कोणीही जावू शकत नाही. (योहान १४:६) आणि हेच ते सत्य आहे ज्याला

समजून एक व्यक्ती स्वत: आपल्या इच्छेनुसार एक ख्रिस्ती बनू इच्छितो. पण का प्रभू येशूने हे म्हटले मार्ग, सत्य व जीवन मीच आहे आणि माझ्याद्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणीही जावू शकत नाही ?

आता देवाजवळ तर सर्व लोक जावू इच्छितात, कारण सर्व लोकांना हे माहीत आहे की हे जग आमचे सर्वकाळचे घर नाही. आम्हा सर्वांना एक ना एक दिवस येथून जाणे आहे, आणि सर्वच परमेश्वराजवळ जावू इच्छितात. कारण जर कोणी परमेश्वराजवळ गेला नाही तर तो नरकात जाईल आणि नरकात कोणालाही जावू वाटत नाही. परंतु परमेश्वराजवळ जाण्याचा मार्ग कोणाला ठावूक आहे ? कोणत्या मार्गावर चालल्याने आम्ही परमेश्वराजवळ जावू शकतो ?"मार्ग" येशू ख्रिस्ताने म्हटले होते, मी आहे कारण तो म्हणजेच येशू ख्रिस्त देवाकडून आला होता तो देवाचा शब्द होता. तो देव होता तो स्वत: स्वर्ग सोडून पृथ्वीवर आला होता आणि त्याने भूतलावर एका मनुष्यरूपात येवून आपले स्वत:चे बलीदान देऊन साऱ्या मानवजातीच्या पापाचे प्रायश्चित्त केले आणि ह्यामुळेच त्याने म्हटले होते की 'मार्ग' मी आहे. माझ्याद्वारे प्रत्येक मनुष्य परमेश्वराजवळ जावू शकतो. कारण की तो सर्व जगाच्या पापाचे प्रायश्चित्त आहे.

परमेश्वराच्या स्वर्गामध्ये जाण्यास मनुष्याला केवळ एकच गोष्ट थांबवू शकते ती गोष्ट म्हणजेच पाप आहे आणि कोणताच मनुष्य जगामध्ये असा नाही की ज्याने कधीही पाप केले नाही. बायबल आपल्याला सांगते "सर्वांनी पाप केले आहे (रोम ३:२३) पण मनुष्य आपल्या पापापासून मुक्तता स्वत:ला कशी काय देवू शकतो? मनुष्य आपल्या पापाची क्षमा कशी काय मिळवू शकतो. जर कोणी एका खोलीमध्ये स्वत:ला बंद करून पूजा अर्चना करून चांगल्या विचारावर मन लावू लागला तरी त्याला त्यासर्व पापांची क्षमा कशी मिळेल. जी पापे त्याने खोली बंद करण्याच्या आधी केली होती? म्हणून खरे हे आहे की प्रत्येक मनुष्याला पापामुक्ती मिळवण्याची गरज आहे, पण

कशी? काय मनुष्याजवळ अशी कोणतीही वस्तू नाही की, जी परमेश्वराला आपल्या पापांच्या क्षमेबद्दल किंवा पापापासून मुक्ती मिळवण्याबद्दल देवू शकतो ? वास्तविकता ही आहे की मनुष्याजवळ आपले काहीच नाही कारण पृथ्वीवर आणि आकाशामध्ये जे काही आहे ते सर्व परमेश्वराचे आहे कारण ते सर्व परमेश्वराने बनविले आहे. म्हणून आम्ही, आपल्या पापाच्या सुटकेसाठी व पापाच्या क्षमेबद्दल परमेश्वराला काहीच देवू शकत नाही. केवळ परमेश्वराच्याच योजनेच्याद्वारे पापासून तारण होवू शकते किंवा आम्हाला आपल्या पापापासून मुक्ती आणि पापांची क्षमा देवू शकतो. आणि वचनात लिहिले आहे की, ''येशू ख्रिस्ताने परमेश्वराच्या योजनेने प्रत्येक मनुष्याबद्दल मृत्यूचा आस्वाद चाखला (इब्री २:९) म्हणजे येशूला क्रूस खांबावर टांगले. तो देवाकडून आमच्या पापाचे प्रायश्चित्त आहे आणि हेच कारण आहे, की का येशूने असे म्हटले की, माझ्यावाचून परमेश्वराजवळ कोणीही जावू शकत नाही कारण की मार्ग, सत्य व जीवन मीच आहे.

पण येशू ख्रिस्ताजवळ मनुष्य कसा येतो ? कसा तो त्याचा अनुयायी बनतो ? शास्त्रात असे लिहिले आहे की, प्रत्येक व्यक्ती जो ख्रिस्ताच्या सुवार्तेला ऐकतो की येशू ख्रिस्त देवाचा पुत्र आहे तो स्वर्ग सोडून पृथ्वीवर आला आणि जो मानवतेच्या पापाचे प्रायश्चित्त करण्यास क्रूस खांबावर देवाच्या इच्छेने बलीदान झाला. जेव्हा तो ह्या सुवार्तेवर विश्वास ठेवतो, ख्रिस्तावर विश्वास ठेवतो तर त्याने पश्चात्ताप केला पाहिजे आणि मग ख्रिस्ताची आज्ञा मानून त्याच्या अधिकाराने आपल्या पापाच्या क्षमेसाठी पाण्यामध्ये पुरले जावून बाप्तिस्मा घेतला पाहिजे आणि ह्या प्रकारे पापाच्या जीवनाला मरून आणि पाण्याच्या कबरेमध्ये आपल्या जुन्या मनुष्याला पुरून त्यातून बाहेर येवून माणूस एक नवा मनुष्य बनतो. ह्याप्रमाणे त्याचा एक नवा आत्मिक जन्म होतो आणि तो ख्रिस्ताचा अनुयायी बनतो. म्हणजेच आता तो आपले जीवन येशू

ख्रिस्ताचा आदर्श घेऊन त्यावर चालून जीवन व्यतीत करतो आणि म्हणून तो व्यक्ती एक ख्रिस्ती म्हटल्या जातो.

पण एक ख्रिस्ती बनून त्या व्यक्तीला काय प्राप्त झाले ? का तो सर्व काही सोडून ख्रिस्ताचा अनुयायी बनण्याविषयी सांगत आहे ? आणि का मी स्वत: एक ख्रिस्ती आहे ? ह्यासाठी कारण एक ख्रिस्ती तो व्यक्ती आहे. ज्याला हे माहीत आहे की, येशू ख्रिस्ताच्या क्रुसखांबावरील बलीदानामुळे आणि त्यावर विश्वास ठेवून त्याची सुवार्ता मान्य करून मला माझ्या पापापासून उद्धार मिळाला आहे आणि ह्यासाठी आता मी परमेश्वराजवळ स्वर्गामध्ये जाईल. हाच तो खरा आनंद आहे, हीच ती खरी शांती आहे आणि हीच ती खरी आशा आहे. ज्याची आवश्यकता जगातील सर्व मानवांना आहे. कारण कोण्याही व्यक्तिने पृथ्वीवर जगातील प्रत्येक वस्तू प्रत्येक सुख प्राप्त केले, परंतु आपल्या पापापासून मुक्ती आणि पापक्षमा प्राप्त केल्याशिवाय ह्या जगातून गेला तर त्या मनुष्याची काय इच्छा असेल? पृथ्वीवर तो एक मोठा शक्तीशाली व्यक्ती असू शकतो. आदरणीय आणि सन्माननीय होवू शकतो. तोएक प्रभावशाली व्यक्तीत्वाचा स्वामी होवू शकतो तो धन आणि मान-सन्मानवाला व्यक्ती होवू शकतो. परंतु ज्या क्षणी तो आपले प्राण सोडील तर ह्यातील कोणतीच वस्तू त्याच्या कामाची राहणार नाही. ह्यासाठी प्रभू येशूने शिकवले होते की, ''मनुष्याने संपूर्ण जग मिळवले आणि आपला जीव गमावला तर त्याला काय लाभ ? अथवा मनुष्य आपल्या जीवाबद्दल काय मोबदला देणार (मत्तय १६:२६). ह्या कारणास्तव जर पृथ्वीवर एखादी वस्तू मौल्यवान आहे ती वस्तू म्हणजेच मनुष्याचा आत्मा होय. कारण सर्वकाही नाशवंत आहे, केवळ मनुष्याच्या आत्मा हाच अमर आहे. कारण मनुष्याचा आत्मा परमेश्वराचे स्वरूप आहे. कारण प्रारंभी देवाने मनुष्याला आपल्या स्वरूपाचे बनवले होते. ना केवळ मनुष्याला देवाने आपल्या स्वरूपाचे पण आपल्या प्रतिरूपाचेच बनवले होते पण शास्त्रात असे

लिहिले आहे की, देवाने मनुष्याला आपल्या समानतेनुसार बनवले म्हणजेच सुरवातीला मनुष्य परमेश्वराप्रमाणेच पवित्र व शुद्ध होता. म्हणजेच त्याच्यामध्ये पाप नव्हते. पण पाप करून मनुष्याने स्वत:ला अशुद्ध आणि अपवित्र बनवून घेतले आणि ह्याप्रकारे त्याने स्वत:ला देवापासून वेगळे केले. परंतु परमेश्वराचा धन्यवाद असो की त्याने आपल्या शब्दाला मनुष्य बनवून पृथ्वीवर पाठवले आणि त्याला आमच्या पापाचा दंड देवून आम्हाला पापापासून मुक्ती देवून आपल्याजवळ येण्याचा एक मार्ग दिला.

परंतु देवाला जे करायचं होते तेच त्याने केले आणि आता आपले कर्तव्य आहे की आम्ही त्याचे ऐकून त्याचे मानावे. म्हणजेच त्याच्या सुवार्तेला मानावे आणि त्याच्या आज्ञेद्वारे जीवन जगावे.

ooo

कोणत्या मार्गावर चालल्याने आम्ही परमेश्वराजवळ जावू शकतो ?''मार्ग'' येशू ख्रिस्ताने म्हटले होते, मी आहे कारण तो म्हणजेच येशू ख्रिस्त देवाकडून आला होता तो देवाचा शब्द होता. तो देव होता तो स्वत: स्वर्ग सोडून पृथ्वीवर आला होता आणि त्याने भूतलावर एका मनुष्यरूपात येवून आपले स्वत:चे बलीदान देऊन साऱ्या मानवजातीच्या पापाचे प्रायश्चित्त केले आणि ह्यामुळेच त्याने म्हटले होते की 'मार्ग' मी आहे. माझ्याद्वारे प्रत्येक मनुष्य परमेश्वराजवळ जावू शकतो. कारण की तो सर्व जगाच्या पापाचे प्रायश्चित्त आहे.

# सर्वांकरीता परमेश्वराची कृपा

**माईकल एल. किंग**

मित्रांनो, हे खरं आहे की जग एका विशाल बागेसारखे आहे. ज्यात प्रत्येक प्रकारचे रंगबेरंगी, लहान-मोठे सुगंधीत आणि असुगंधीत मुलायम व काटेरी झाडे झुडपे बघायला मिळतात. ह्या पृथ्वीवर सरासरी ६०० करोड लोक राहतात आणि त्या लोकांचे वेगवेगळे रंग-रूप आहेत. वेगवेगळ्या भाषा, वेगवेगळी संस्कृती पण त्या सर्व लोकांना एकाच देवाने बनवले आहे. आम्हा सर्वांचा तो परमेश्वर पिता कोणाचाही पक्षपात करीत नाही.

जेव्हा आम्ही शारीरिक दृष्टिकोनातून ह्या गोष्टीवर विचार करतो व आम्ही पाहतो त्या स्वर्गीय पित्याने आम्हा सर्वांसाठी पाणी आणि हवा आणि प्रत्येक प्रकारचे खाण्यापिण्याची वस्तू निर्माण केल्या आहेत. त्याच्या ऊन आणि पावसाचे आम्ही सर्व भागीदार आहोत. तो कुणाचाही पक्षपात करत नाही. होय तो आपली कोणतीही वस्तु जोरजबरीने देत नाही. पण त्याने आम्हा सर्वांसाठी त्या वस्तू बनवल्या आहेत आणि ते सर्व निर्णय आम्हावर आहे की, आम्ही त्याने दिलेल्या वस्तू प्राप्त करून  खाणेपिणे व ग्रहण करणे त्या लाभ घेणे आम्हाला स्वत: करावे लागते. देव कुणाचाही पक्षपात करीत नाही. त्याच्यासमोर सर्वजण आपण समान आहोत. त्याने सर्व काही सर्वांसाठी निर्माण केले. पण त्या गोष्टीला प्राप्त करणे व त्याचा लाभ घेणे हे सर्व काम आमचे

आहे आणि जेव्हा ह्या गोष्टीला आम्ही आत्मीक दृष्टिकोनातून पाहतो तर तिथे सुद्धा आम्हाला हीच गोष्ट मिळते की, आता आम्ही सर्व ही गोष्ट जाणतो की सर्व जण पापी आहोत म्हणजेच पृथ्वीवर कोणीही असा मनुष्य नाही की ज्या व्यक्तीने कधीच कोणतेच पाप केले नाही. वास्तविकता: सर्व जग पापांच्या हातात आहे.जिथे मनुष्य आहे तिथे पाप आहे आणि पापामुळे साऱ्या मानवजातीचे भविष्य केवळ नरक आहे. कारण पापासोबत कोणताच मनुष्य देवाच्या पवित्र स्वर्गामध्ये प्रवेश करू शकत नाही. परंतु देव आमचा स्वर्गीय पिता आहे. त्यानेच आम्हास बनविले आहे आणि ह्यामुळे तो आमच्यावर प्रेम करतो आणि कारण तो आमच्यावर प्रेम करतो आणि त्यामुळे त्याची इच्छा आहे की आम्ही सर्वचे सर्व त्याच्याजवळ येऊन त्याच्यासोबत स्वर्गात रहावे. परंतु पाप मध्ये येते व मनुष्याला देवाजवळ जाण्यापासून अडवते.

म्हणून ह्यासाठी पृथ्वीवर मनुष्याचा सर्वात मोठा प्रश्न पाप आहे. पाप सर्वांच्या जीवनात आहे पाप मनुष्याला देवापाशी जाण्यापासून अडवते. मनुष्याने जमिनीवर मोठे मोठे काम केले आहे आणि तो बहुत मोठे मोठे काम करू शकतो; परंतु मनुष्य पापाच्या शिक्षेपासून आपणाला (स्वत:ला) मोकळे करू शकत नाही. ज्याप्रकारे जीवन आणि मृत्यू मनुष्याच्या हातामध्ये नाही. त्याचप्रकारे पापापासून सुटका मिळवणे सुद्धा मनुष्याच्या हातामध्ये नाही.

शास्त्रात लिहिले आहे की, सर्वांनी पाप केले आहे. (रोम ३:२३) परंतु शास्त्रसुद्धा सांगते की, परमेश्वराचा हात इतका लहान नाही की तो मनुष्याला पापांच्या खाचेतून बाहेर काढू शकणार नाही आणि तो असा बहिरा नाही की मनुष्याची तारणासाठी आवाज तो ऐकू शकणार नाही. परंतु तुमचे अपराध व तुमच्या पापांमुळे त्याचे तोंड तुम्हा पासून लपवित आहे व तो तुमचे ऐकत नाही. (यशया ५९:१-२)

ह्यामुळे परमेश्वराजवळ येण्यालायक बनण्यासाठी त्याच्या स्वर्गामध्ये प्रवेश करण्यायोगे बनण्यासाठी मनुष्याला आपल्या पापापासून

सुटका मिळणे आवश्यक आहे. परंतु मनुष्य काहीही करून व काहीही देवून आपल्या पापांपासून मुक्तता मिळवू शकत नाही. त्याला देवाची गरज आहे कारण की फक्त देवच काही असा उपाय काढू शकतो की ज्यामुळे मनुष्याला पापाची शिक्षा पण मिळावी म्हणजेच ज्यामुळे मनुष्याच्या पापाचे प्रायश्चित्त पण व्हावे आणि त्याला पापांपासून मुक्तापण मिळावी, आणि देवाच्या वचनाचे पुस्तक पवित्रशास्त्र यामध्ये आम्हाला ही सुवार्ता मिळते की, परमेश्वराची ती योजना जी सर्व लोकांच्या तारणाचे कारण आहे. साऱ्या जगामध्ये प्रकट आहे तो आम्हाला सुचवितो की आम्ही सर्व अभक्ती आणि संसारिक अमिषांवरून मन फिरवून धार्मिकतेनुसार जीवन जगावे. धन्य आशा म्हणजे आपला थोर देव व तारणारा असा जो येशू ख्रिस्त त्याचे गौरव प्रगट होण्याची वाट पहात आपण अभक्तीला आणि ऐहीक वासनांना नाकारून सांप्रतच्या युगात मर्यादेने नितीने व सुभक्तीने वागावे. त्याने स्वत:ला आपल्याकरिता दिले. ह्यासाठी की त्याने खंडणी भरून आपल्याला सर्व स्वैराचारापासून मुक्त करावे आणि चांगल्या कामात तत्पर आपले स्वत:चे लोक आपणासाठी शुद्ध करून ठेवावे(तीत २:११-१५).

म्हणजे ह्याप्रकारे आम्ही पाहतो की, सर्व जगातल्या लोकांसाठी पापांपासून मुक्तता मिळविणे गरजेचे आहे. सर्व मनुष्यावर प्रगट आहे आणि परमेश्वराची ती योजना आहे की त्याने आपल्या सोबत राहणारे आपले पवित्र वचन ज्याला त्याने मनुष्यरूपी ह्या जगामध्ये पाठवले ते आपल्या एकुलत्या एक पुत्राच्या रूपात, एका मनुष्याप्रमाणे पृथ्वीवर पाठवले आणि त्याच्याद्वारे मनुष्यामध्ये मोठ-मोठी सामर्थ्यशाली कामे केली होती आणि मोठमोठी महत्त्वपूर्वक शिकवण दिली होती. नंतर त्यालाच देवाने आपल्या अद्‌भूत ज्ञानाने व आपल्या विशाल सामर्थ्याने पापी मनुष्यांच्या द्वेषास आणि विरोधास निशाणा बनवले, म्हणून ज्या लोकांनी देवाच्या निर्दोष आणि एकुलत्या एका पुत्राला पकडून आणि

त्याला दोषी ठरवून त्याला एका अपराध्याप्रमाणे क्रुसखांबावर चढवून मारले आणि ह्याप्रकारे देवाने आपल्या महान आणि अद्‌भूत योजनेला पूर्ण केले होते की त्याने साऱ्या जगाचे व सर्व लोकांच्या पापांबद्दल आपल्याच एकुलत्या एक पुत्राला दंडीत केले आणि तो क्रुसखांबावर आपल्या निर्दोष बलीदानामुळे साऱ्या जगातील लोकांच्या पापांबद्दल परमेश्वराच्या दृष्टीने प्रायश्चित्त ठरला.

आणि ह्या प्रकारे आज पृथ्वीवर कोठेही कोणीही व्यक्ती येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवून आणि पापापासून आपले मन फिरवून आणि आपल्या पापांच्या क्षमेसाठी येशू ख्रिस्ताच्या आज्ञेनुसार पाण्यामध्ये बाप्तीस्मा घेवून परमेश्वराच्या योजनेनुसार आपल्या पापासून उद्धार प्राप्त करू शकतो आणि ह्याप्रकारे देवाचे मुले होवून एक चांगले आणि नीट आणि पवित्र जीवन जगू शकतो आणि जो मनुष्य देवाच्या इच्छेनुसार असे करतो तो हे जाणतो की त्याला आपल्या पापांची शिक्षा मिळणार नाही. कारण की देवाचा पुत्र येशू ख्रिस्त त्याच्या पापाचे प्रायश्चित्त आहे आणि तो ह्या जीवनानंतर त्या स्वर्गातील उत्तम जीवनामध्ये प्रवेश करील, जेथे परमेश्वर आणि त्याचे लोक सर्वदा राहतील.

काय तुम्ही परमेश्वराच्या सुवार्तेला मान्य केले आहे? काय आपण परमेश्वराच्या सुवार्तेला मान्य करून त्याच्या स्वर्गामध्ये प्रवेश करण्यालायक स्वत:ला तयार कराल?

ooo

# दृष्टी वर लावली...

**बेट्टी बर्टन चोट**

एका प्रखर उन्हाच्या दिवशी दोन माणसे रस्त्याने चालली होती. बॉब थबकला, कागदाचा लहान तुकडा त्याच्या पायाजवळ फडफडत होता. ''हे काय आहे?'' त्याने विचारले, ''अरे, काही महत्त्वाचे नाही. एखाद्या लहान मुलाचा शाळेचा पेपर आहे, कदाचित गृहपाठ असेल. बघ,अंक बनवण्यासाठी सुद्धा त्याचा त्रास बघ. हा कदाचित पहिलीचा आहे. याचे हे बेरजेचे गणित चुकले आहे. २ + २ = ५. चूक !'' तो हसला.

''नाही, तुझ्या स्पष्टीकरणासाठी, उद्देश आणि हुशारीची गरज आहे.'' बिल नाकारून उद्‍गारला, ''मी म्हणेल की कितीतरी मिलियन वर्षापेक्षा जास्त तो कागद हळू आणि संथपणे निर्माण झाला. जे मुलानी गणित सोडवले तो फक्त काळाचा, वयाच्या नुसार झालेला परिणाम आहे.''

बॉबने आश्चर्यकारक रितीने पाहिले पण तो काहीच म्हणाला नाही. थोडेसे पुढे गेल्यावर ते एका उतरत्या टेकडीवर उंचावर होते. जेथपर्यंत नजर जाईल, तेथपर्यंत गुडघ्याएवढी पिकलेल्या धान्याची शेती होती. ''ही शेती चालविणारा माणूस खरंच एक सामर्थ्यवान

व्यवस्थापक आहे. तो उद्गारला ''अशा प्रकारच्या हजारो एकरच्या शेतीमध्ये पीक लावणी आणि कापणी करण्यासाठी कोणत्या प्रकारचे नियोजन आणि यंत्रसामुग्री लागत असेल ?

''तू पुन्हा एकदा चुकतोय.'' बिल उत्तरला. हे फक्त शेती सारे दिसत आहे. पण हे तसे नाही. हजारो वर्षापूर्वी लहान ओळी विकसित होण्यास सुरूवात झाली आणि शेवटी माती जेव्हा तयार होती 'बी' दूर अंतरावरून उडत येवून इथे पडले. याचा परिणाम तू आता पाहतोस. पण हे सर्व होण्यासाठी हजारो वर्ष लागले.

''तुझे म्हणणे आहे की यासाठी कुठल्या विचारांची आणि तज्ञतेची गरज नाही पडली?'' बॉबने विचारले.

''नाही, हे फक्त घडले. तुला माहीत आहे. पुरेसा वेळ दिला गेला तर काहीही घडू शकते.''

तेवढ्यात एक लाल रंगाची स्पोर्टी कार जोरात बाजूने गेली. बॉबने स्वत:ला वाचविण्यासाठी बाजूला उडी मारली.

''तू पाहिलंस तो नक्की दीडशे मैल ताशी या वेगाने चालवित होता. मला आश्चर्य वाटते अशा मजबूत, सामर्थ्यशाली इंजिन ज्याद्वारे एवढा वेग येतो, कोणी बनवले असेल?

''खरे तर बिल कार कडे पाहत म्हणाला, ''कोणीही ती कार बनवली नाही. तुला माहीत आहे. पुरेशा वेळेनुसार, काळाप्रमाणे ती विकसित झाली. नैसर्गिक निवड प्रक्रियेनुसार त्यांनी स्वत:ला सुधारले जेणे करून तू आता ही लाल गाडी (कार) तुफानी वेगाने पळतांना पाहू शकतो. पण अशा प्रकारचे आश्चर्य एका रात्रीत निर्माण होत नाही. त्यासाठी हजारो वर्ष लागतात.

दुसऱ्या टेकडीच्या टोकावरून ते शहराची बाह्यरेषा पाहू शकत होते. तुला माहीत आहे. हुशार, स्मार्ट आर्किटेक्टने ह्या सर्व इमारती डिझाईन केल्यात. बॉब म्हणाला, हे शहर खूपच मोठे पण सुंदर आहे. कधी कधी मला आश्चर्य वाटते की कुणी एवढे सुंदर नियोजन आणि

बांधकाम करण्याचे धाडस कसे करू शकते. मला कळत नाही कुठून सुरूवात केली.

''हे हजारो वर्षापूर्वी सुरू झाले जेव्हा हे सर्व एक ऐतिहासिक समतल, ज्वालामुखी आणि उष्ण वायू होते.'' बिलने उत्तर दिले ''तुला माहीत आहे की, भौतिक आणि रासायनिक नियमामुळे हे सर्व तत्त्व एकमेकांना एकत्र ओढतात. ह्यामुळे एका ठराविक काळानंतर ह्या नियमामुळे हे सर्व एकत्र आले आणि आज तू हे पाहतोस. यामागे कोणीही महान आर्किटेक्चर नाही आणि कोणीही असा महान बांधकाम करणारा बिल्डर वगैरे नाही. ज्याने या भिंती, इमारती बांधल्या. एका ठराविक काळानंतर जगिक नियमानुसार ते झाले.

एवढ्यात रात्र झाली. बॉब आणि बिल एका पाट्याच्या शेजारी जंगल परिसरात पोहचले होते. त्यांनी त्यांचा तंबू बांधला. आगीची व्यवस्था करून आपले रात्रीचे जेवण बनवून खाल्ले आणि नंतर आगीजवळ आरामात बसले. ''तुला माहीत आहे?'' बॉब विचार करून बोलला'' जेव्हा मी वर चांदणे बघतो, तेव्हा माझे मन परमेश्वराच्या महानतेमुळे व सामर्थ्यामुळे भरून येते. ते म्हणतात, अशा शेकडो हजारो आकाशगंगा आहेत. हे अंतराळ अंतहीन आहे. तरीही देवापाशी केवळ याच्या बाहेर काही बनवण्याचे नाही तर प्रत्येक जीवित प्राण्याच्या अतिसूक्ष्म कणामध्ये देखील सामर्थ्य आहे. तुला याचे आश्चर्य वाटेल ते कशा प्रकारे असेल. एके दिवशी प्रत्यक्ष त्याच्या उपस्थितीत, ''तो जसा आहे तसा पाहणे'' कसे वाटेल जेव्हा न्याय होईल की आपल्याला जे जीवन दिले ते आपण कसे जगलो हे सांगायला.

''जेव्हा मी त्या चांदण्याकडे बघतो'' बिल हसत म्हणाला, ''मला वाटते, हे सर्व स्वत:हून प्रस्थापित होण्या साडे चौदा बिलियन वर्षे लागली आणि मी देवाचा विचार करीत नाही. मी माझ्या मनाला पूर्वीच ठाम केले आहे. असा कुणीही देव नाही. आम्हीही कधी ही

यासाठी जात नव्हतो की कुठेतरी जाऊन सामर्थ्यशाली आत्मिक अध्यात्मिक गोष्टी पाहण्यास ज्या सगळीकडे आहेत, त्या पाहून अचानक आपले डोळे उघडावे.

त्या रात्री बिल मरण पावला आणि ''... त्याने आपली दृष्टी वर लावली...'' (लुक १६ : १९-३१) बेट्टी बर्टन चोट विनोना येथे काम करतात. वर्ल्ड इवेंजिलिज्म टीमध्ये एम एस आहेत.

ooo

दुसऱ्या टेकडीच्या टोकावरून ते शहराची बाह्यरेषा पाहू शकत होते. तुला माहीत आहे. हुशार, स्मार्ट आर्किटेक्टने ह्या सर्व इमारती डिझाईन केल्यात. बॉब म्हणाला, हे शहर खूपच मोठे पण सुंदर आहे. कधी कधी मला आश्चर्य वाटते की कुणी एवढे सुंदर नियोजन आणि बांधकाम करण्याचे धाडस कसे करू शकते. मला कळत नाही कुठून सुरूवात केली.

# बाप्तिस्म्यामध्ये काय घडते ?

- जेरी बेट्स

**बा**प्तिस्म्यामध्ये काही धर्मविषयक कृतीमध्ये अधिक वाद आहेत. अधिकतर ख्रिस्ती जगतामध्ये आपल्या तारणासाठी हे काय करू शकते ह्याबद्दल विश्वासच नाही. पापांची क्षमा मिळाली आहे हे दाखविण्यासाठी फक्त बाप्तिस्मा विधीचे प्रतिक आहे असे काही लोक म्हणतात. रोमकरास पत्र ६:३-४ पेक्षा दुसरा कोणताही भाग स्पष्टपणे ह्या दृष्टिकोनाविरुद्ध बोलत नाही किंवा आपण जितक्यांनी ख्रिस्त येशूमध्ये बाप्तिस्मा घेतला तितक्यांनी त्याच्या मरणात बाप्तिस्मा घेतला, ह्याविषयी तुम्ही अजाण आहा काय? तर मग आपण त्या मरणातील बाप्तिस्म्याने त्याच्याबरोबर पुरले गेलो, ह्यासाठी की ज्याप्रमाणे ख्रिस्त पित्याच्या गौरवाने मेलेल्यातून उठला त्याचप्रमाणे आपणही नवीन प्रकारच्या जीवनात चालावे.''

आम्हाला समजणे गरजेचे आहे की रोमकरांस पत्र ६ वा अध्याय हा बाप्तिस्म्यासंबंधी नाही. तो पापासंबंधी आहे. ह्या अध्यायामध्ये १६ वेळेस ''पाप'' हा शब्द आढळतो. पौल ख्रिस्ती लोकांना उत्तेजन देवून आठवण करायला सांगतो की जेव्हा त्यांनी बाप्तिस्मा घेतला तेव्हा काय घडले ? मला माहीत नाही की कोणीही या परिस्थितीवर प्रश्न विचारला असेल की आमच्या क्षमेसाठी ख्रिस्ताच्या बलिदानावर विश्वास असणे आवश्यक आहे. तरीही प्रश्न हा आहे की, ''केव्हा आमचे पाप धुतल्या जातात?''

पौल म्हणतो की हे बाप्तिस्म्यामध्ये घडून येते. बाप्तिस्मा हा चिन्ह आणि परंपरा ह्यापेक्षा अधिक आहे. हे आमच्या शारीरिक आज्ञापालनाच्या कृतीपेक्षाही मोठे आहे. रोम ६:२ मध्ये पौलाने शिकविले

की आम्ही जेव्हा बाप्तिस्मा घेतला तेव्हा आम्ही पापाला मेलो. ६:३ मध्ये पौलाने घोषित केले की, ''आम्ही ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा घेतला. त्याचप्रमाणे त्याच्या मृत्यूमध्ये ही बाप्तिस्मा घेतला.''

अनेक लोक सहमत होतील की येशूच्या रक्ताच्याद्वारे आमची पापे धुतल्या जातात (प्रकटी १:५), पण आम्ही कशाप्रकारे येशूच्या रक्ताच्या संपर्कात येवू ? वधस्तंभावर येशूचे रक्त सांडल्या गेले. जेव्हा येशूचा मृत्यू झाला तेव्हा एका सैनिकाने येशूच्या कुशीमध्ये भाला भोसकला आणि रक्त आणि पाणी त्यातून निघाले (योहान १९:३४). जेव्हा आम्ही बाप्तिस्मा घेतो तेव्हा आम्ही येशूच्या मृत्यूमध्ये बाप्तिस्मा घेतो, की जेथे रक्त सांडल्या गेले आहे. ह्या प्रकारे आम्ही येशूच्या रक्ताच्या संपर्कात येतो, की जे आमची पापे धुवून काढतात. पापाला मेल्याशिवाय कोणाचेही तारण होवू शकत नाही. ख्रिस्तासोबत एकत्रित जोडल्याशिवाय कोणाचेही तारण होत नाही. येशूच्या रक्ताच्या संपर्कात आल्याशिवाय कोणाचेही तारण होत नाही. प्रेषित पौलाच्या म्हणण्याप्रमाणे ह्या सर्व घटना बाप्तिस्म्यामध्ये घडतात.

पौलाने हे सुद्धा म्हटले की बाप्तिस्म्यानंतर, आम्ही नवीन जीवनामध्ये चालण्यासाठी उठतो. बाप्तिस्म्यामध्ये पौल लिहितो की आमचा बाप्तिस्मा प्रभाव टाकणारा येशूच्या मृत्यूवर, गाडल्या जाणे आणि पुनरूत्थानावर प्रभाव टाकणारा आहे. येशूने त्याचे शारीरिक जीवन संपविले पण फक्त नवीन पुनरूत्थित जीवनाच्या प्रारंभासाठी. ह्याप्रमाणे, आम्ही पापाला मरतो; तसेच आम्ही आमचे मागील जीवन संपवितो आणि शुद्धतेच्या नवीन जीवनाला प्रारंभ करतो. आम्ही फक्त थोडक्याच गोष्टी बदलत नाही किंवा थोडक्याच चूका पुसत नाही. आम्ही नवीन जीवनाला सुरूवात करतो. बाप्तिस्त्म्यामध्ये आम्ही आमचे जुने जीवन संपवितो आणि नवीन जीवनाला सुरूवात करतो. ''म्हणून

जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ती आहे; जुने ते होऊन गेले पाहा; ते नवे झाले आहे''. (२ करिंथ ५:१७). परिणाम स्वरूप आम्ही एकाग्रचित्त ख्रिस्ताला समर्पित जीवनाची सुरूवात करतो.

बाप्तिस्मामध्ये काय घडते हे पौलाने लिहिलेले आहे. ह्यावर विचार करा, मग बाप्तिस्मा हा फक्त परंपरा किंवा चिन्ह आहे असे कोणीही करते म्हणू शकतात? जे हे एक प्रतिक आहे तर ते माणसाच्या सामर्थ्याचे नव्हे, पाण्याच्या सामर्थ्याचे नव्हे तर देवाच्या सामर्थ्याचे प्रतिक आहे.

• • •

''म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ती आहे; जुने ते होऊन गेले पाहा; ते नवे झाले आहे''.

(२ करिंथ ५:१७).



# आत्म्याविषयी काळजी

- लुईस रशमोअर

''आंधळेपणा हा पुरुष जातीचा नमुना'' ही म्हण विशिष्ट ठिकाणी काही स्त्रियांकडून व माझ्या पत्नीकडूनही अनेकदा पुरुषांसाठी आणि काही बाबतीत माझ्यासाठीही ऐकलेली आहे. ही विधाने तात्काळ प्रकट होतात की जेव्हा मला एखादी वस्तु रेफ्रिजरेटर मध्ये सापडत नाही की जी वस्तू त्यामध्येच असते. (मला विचार करायला भाग पाडते, की कदाचित जर ''आंधळेपणा हा पुरुषजातीचा साचा'' आहे तर कदाचित'' आंधळेपणाचा स्त्रीचा जातीचा साचा'' सुद्धा अस्तित्वात असेल.'') कोणी तरी एखादा असाही वाक्प्रचार करेल की एखादी वस्तु दृश्यस्वरूपात आहे पण शोधता येऊ शत नाही. जसे की ''जर साप असता तर त्याने तुम्हाला चावा घेतला असता!'' मला असे वाटते की, आपण सर्वच एखाद्या विशिष्ट प्रसंगी जी वस्तू दृश्य स्वरूपात आहे त्याबद्दल आम्हाला

काहीच जाणीव नसते. अनेक वेळेस, आमचा आंधळेपणा ज्या वस्तूंचे महत्त्वही आम्हाला नाही ती शोधण्यामागे आणि आमच्या प्रापंचिक गरजा शोधण्यामध्येच जातो.

तरीही, जेव्हा आमचा आध्यात्मिक बाबतीत आंधळेपणा असतो की जी एखाद्याच्या सार्वकालिक जीवनासंबंधी आहे, तेव्हा ते मानवाचे गंभीर अपयश आहे. जेव्हा देवाची लेकरे स्वत:च्या आत्मिक उन्नतीसाठी काळजी करीत नाही आणि तसेच इतरांच्याही आत्मिक उन्नती बाबतीत त्यांना फारच कमी उत्सुकता असते, तेव्हा ही आम्हासाठी भयावह सूचना आहे. आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताने स्पष्टपणे हे विधान केले आहे की जगिक वस्तूंपेक्षा आत्मिक गोष्टीला प्रथम स्थान द्या. ''ह्यास्तव काय खावे, काय प्यावे, काय पांघरावे असे म्हणत चिंता करीत बसू नका. कारण ही सर्व मिळविण्याची धडपड परराष्ट्रीय लोक करीत असतात. तुम्हाला ह्या सर्वांची गरज आहे हे तुमचा स्वर्गीय पिता जाणून आहे तर तुम्ही पहिल्याने त्याचे राज्य व त्याचे नीतिमत्व मिळविण्यास झटा म्हणजे त्यांच्याबरोबर ह्याही सर्व गोष्टी तुम्हाला मिळतील'' (मत्तय ६:३१-३३). तथापि आध्यात्मिक बाबतीत असलेल्या आंधळेपणाचा मोठा इतिहास देवाच्या लेकरांचा आहे. ''यशयाचा संदेश त्यांच्याविषयी पूर्ण होत आहे, तो असा की, तुम्ही ऐकाल तर खरे, परंतु तुम्हाला समजणारच नाही व पहाल तर खरे; परंतु तुम्हाला दिसणारच नाही. कारण ह्या लोकांचे अंत:करण जड झाले आहे, ते कानांनी मंद ऐकतात आणि त्यांनी आपले डोळे मिटून घेतले आहेत. ह्यासाठी की त्यांनी डोळ्यांनी पाहू नये कानांनी ऐकू नये, अंत:करणाने समजू नये, वळू नये आणि मी त्यांना बरे करू नये'' (मत्तय १३:१४-१५; यशया ६:९-१०).

आपल्या प्रभूने त्याच्या शिष्यांना की जे जगीक वस्तूमध्ये राहत

आहेत त्यापेक्षा पलीकडे पाहण्यासाठी सांगितले, ह्यात काही अद्‌भूत आहे का?

जेव्हा येशू ख्रिस्ताने त्याच्या शिष्यांना आत्म्याची काळजी घेण्याबद्दल आव्हान दिले तेव्हा त्याने म्हटले, ''अजून चार महिन्यांचा अवकाश आहे, मग कापणी येईल असे तुम्ही म्हणता की नाही? पाहा, मी तुम्हाला म्हणतो, आपली नजर वर टाकून शेते पाहा, ती कापणीसाठी पांढरी होऊन चुकली आहेत'' (योहान ४:३५). येशू ख्रिस्त शेतातील पिकांच्या कापणीबद्दल व ज्यांची वाढ झालेली आहे त्याबद्दल बोलत नाही. पण तो शेतीविषयक उदाहरण घेऊन त्याच्या शिष्यांना त्याच्या सेवेमध्ये भाग घेण्यासाठी ''की हरवलेले शोधण्यासाठी व तारणासाठी'' (लूक १९:१०) ह्यावर अधिक भर देत आहे. स्वर्गात घेतल्या जाण्याच्या पूर्वी प्रभूने त्याच्या शिष्यांना सातत्याने सांगितलेले शब्द हे आहेत की, ''सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा'' (मार्क १६:१५).

प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने आत्म्याची काळजी करणे गरजेचे आहे. आम्हा प्रत्येकाला हे समजणे गरजेचे आहे की आमचे शरीर हे आमच्या सन्माननीय आत्म्यासाठी एक फक्त वाहन आहे. जसे की तुलनात्मक रितीने एखादा व्यक्ती वाहन आतमध्ये बसून चालवित आहे तसा आमच्या प्रत्येकामध्ये आत्मा आहे. कार व्यक्ती नाही, पण कारमध्ये असलेली व्यक्ती आहे. कारण आणि आतमध्ये चालविणारी व्यक्ती निराळे आहेत. त्याचप्रमाणे जसा व्यक्ती कार सोडून बाहेर यतो तसेच एखाद्याचा आत्मा त्याचे शरीर सोडून देते (याकोब २:२६) तसेच जोपर्यंत एखाद्याचा जीवनात प्रभूचे दुसरे येणे होत नाही (१ थेस्सलनी ४:१५).

आपण सर्वप्रथम स्वत:ची प्रवृत्ती आणि प्रामुख्याने आत्म्याबद्दल अधिक वाढणे गरजेचे आहे. तसेच त्यानंतर द्वितीय की ज्यामध्ये आमचा

सन्माननीय आत्मा राहतो त्या शरीराविषयी ओळखणे गरजेचे आहे. ख्रिस्ती लोकांनी कुटुंबातील सदस्याकडे, मित्रांकडे, शेजाऱ्याकडे, सहकाऱ्याकडे, वर्गमित्रांकडे आणि लोकांकडे वेगळ्या नजरेने पाहणे गरजेचे आहे की जे आपण पूर्वी वेगळ्या मार्गाने त्यांच्याकडे पाहत असतो. उद्देश हा आहे की आम्हाला त्यांच्याकडे पूर्णपणे-आत्मा असलेली व्यक्ती म्हणून पाहायचे आहे न की त्यांच्या शारीरिक चारित्र्यावरून ओळखायचे आहे (जसे की, चेहरे, कामगिरी, लिंगभेद आणि वंश) प्रत्येकजण हा महत्वाचा मूल्यवाण आत्मा आहे. जगातील संपूर्ण संपत्ती एकत्र केल्यानंतर सुद्धा त्यापेक्षाही आत्मा हा किंमतीवाण आहे (मत्तय ११:२६). ख्रिस्ती व्यक्तीने आत्म्याबद्दल काळजीपूर्वक असायलाच पाहिजे.

ख्रिस्ताच्या मंडळ्यांनी आत्म्याची काळजी करणे गरजेचे आहे. प्रत्येक मंडळी आणि एकत्रितकपणे असलेल्या मंडळ्या बंधुत्वाचा भाग असतात म्हणून सार्वत्रिक मंडळी ह्या नात्याने त्यांच्या आत्म्याकडे मानवतेने पाहणे गरजेचे आहे. आत्म्याची काळजी असणारी मंडळी स्वत:कडे आत्म्यांची सभा म्हणून प्रथम पाहील आणि फक्त द्वितीय म्हणून इतरांसोबत स्वत:कडे शारीरिक शरीर म्हणून पाहिल. लिंगभेद, पिढी आणि वंश ह्यावर प्रामुख्याने लक्ष केंद्रीत करण्यापेक्षा देवाच्या लेकरांमध्ये असलेल्या आत्म्याबद्दल प्रथम आणि प्रामुख्याने विचार करा. मंडळयातील सभासदापर्यंत मर्यादित असण्यापेक्षा, जगातील आत्मिकतेकडे आज सहस्त्रदशलक्ष मूल्यवान आत्मे मर्त्य शरीरात निवास करीत आहेत त्याकरिता मंडळयातील सभासदापर्यंतच मर्यादित असण्याऐवजी, जगातील आत्मिकतेकडे पहा., (नक्कीच, विश्वासू ख्रिस्ती लोकांनी जी भूमिका त्यांना वचनात दिलेली आहे त्याबद्दल जाणीव असणे आवश्यक आहे.)

पालकांनो, तुमची लेकरे तात्पुरत्या घरात, शरीरामध्ये अतुट आत्मा असलेली आहेत. बंधुजनहो, तुमच्या कुटुंबातील सदस्यांचे आत्मे देहामध्ये वेष्टिलेले आहेत. आमच्या आजुबाजूला व जेथे कोठे आम्ही एखाद्याला पाहू ते आत्मे आहेत. प्रत्येक आत्म्याला जो ह्या पृथ्वीतलावर आहे त्याला येशू ख्रिस्ताच्या सुवार्तेची आणि तारणाची आणि तसेच सार्वकालिक अभिवचनाची गरज आहे. खरोखर, आमच्या व आजुबाजूला असलेली आत्मे, आत्मिक शेतामध्ये कापणीसाठी पांढरी होऊन चुकली आहेत.

आत्म्याची काळजी असणारे व्हा ! आत्मिक चष्म्यातून आत्मे पहा. आपल्या स्वत:च्या तारणासाठी आणि इतरांच्या आत्म्यांच्या सुटकेसाठी तुम्ही अवलंबून आहात त्याचप्रमाणे प्रभूची मंडळीही आत्म्याची काळजी करणारी आहे. जेव्हा तुम्ही एखाद्याच्या संपर्कात येता तेव्हा तुम्ही काय पाहता?

• • •

''ह्यास्तव काय खावे, काय प्यावे, काय पांघरावे असे म्हणत चिंता करीत बसू नका. कारण ही सर्व मिळविण्याची धडपड परराष्ट्रीय लोक करीत असतात. तुम्हाला ह्या सर्वांची गरज आहे हे तुमचा स्वर्गीय पिता जाणून आहे तर तुम्ही पहिल्याने त्याचे राज्य व त्याचे नीतिमत्व मिळविण्यास झटा म्हणजे त्यांच्याबरोबर ह्याही सर्व गोष्टी तुम्हाला मिळतील'' (मत्तय ६:३१-३३).

# तुम्ही देवाच्या वचनावर वाद घालू शकत नाही

- जे.सी.चोट

**अ**नेक लोकांना त्यांच्या विश्वासाला, वागणूकीला आणि परिस्थितीला योग्य असणाराच फक्त पवित्रशास्त्रातील काही वचनांचाच भाग पाहिजे. ह्यामुळे ते काही भागांचा स्वीकार करतात आणि इतर भागांना नकार देतात. ते स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करतात व वाद घालतात की ते त्यांनी का नाकारले आहे. हा पवित्र लेखांचा अपमान आणि दुरूपयोग आहे. आम्हाला सत्याची आवश्यकता आहे आणि सर्व सत्याची वचनामध्ये आवश्यकता आहे. आम्ही त्याच ठिकाणी थांबायला नको. तरीही परंतु प्रत्येक वचनामध्ये जावून सत्याचा स्वीकार करायला पाहिजे. आम्हाला संपूर्ण देवाची इच्छा समजण्याची आवश्यकता

असायला पाहिजे. कोणत्याही देवाच्या वचनाच्या भागाचा मुद्दामहून केलेला अज्ञानीपणा किंवा अस्वीकार आम्हाला मदत करू शकत नाही किंवा कोणालाही अंशत: सत्य पुरेसे होणार नाही. असे काही जण आहेत की ते शिकवितात की प्रत्येकाचे तारण होण्यासाठी 'विश्वासच' ठेवणे गरजेचे आहे. योहान ३:१६; ३:३६; ५:२४ आणि प्रे.कृ.१६:३१ ह्याला मदतीसाठी ही वचने आहेत. इतरही वचने काय शिकवितात हे पाहतांना येथे काही वाद होऊ शकतो पण श्रद्धा किंवा विश्वास गरजेचा आहे याबद्दल वाद होऊच शकत नाही. आम्हाला माहीत आहे की नक्कीच ही वचने प्रत्येकाने विश्वास ठेवायलाच पाहिजे ह्याविषयी शिकवितात. तरीही जेव्हा शौलाच्या तारणामध्ये पाहतो तेव्हा हीच वचने फक्त विचारधीन होऊ शकत नाही. कदाचित, जे कोणी ही वचने 'फक्त विश्वास' शिकवितांना उपयोगात आणतात त्यांनी ह्याला वेगळे केलेले आहे. असेही असू शकते की त्यांनी विश्वासाच्या अर्थाला समजले नसेल किंवा मर्यादित ठेवले असेल.

ख्रिस्ताने आम्हाला म्हटले की, पश्चात्ताप करा किंवा नाश होईल (लूक १३:३). पौलाने म्हटले की सर्व मनुष्यांनी सर्वत्र पश्चात्तापाच्या करावा अशी देवाची आज्ञा आहे (प्रे.कृ.१७:३०). आणखी इतर वचने पश्चात्तापाच्या गरजेबद्दल शिकवितात व त्यावर जोर देतात. कोणी अशाप्रकारे निष्कर्ष काढेल की एखाद्याला तारण प्राप्त होण्यासाठी त्याच्या पापासाठी पश्चात्ताप करणे हे अत्यंत महत्वाची बाब आहे. त्याच वेळेस, एखादा वाद करेल की तारणासाठी ह्याहीपेक्षा अधिक बाबी आहेत. ह्याकडे लक्ष न देता, येथे एक मुद्दा आहे की ह्यावर वादच होऊ शकत नाही आणि ते हे आहे की पापी लोकांनी त्यांच्या पापासाठी पश्चात्ताप करणे देवाला अपेक्षित आहे.

बाप्तिस्म्याच्या गरजेवर जोर देणारी अनेक वचने आहेत

(प्रे.कृ.२२:१६; रोम ६:३). ''फक्त बाप्तिस्म्याने ''तारण होते असा अर्थ आहे का? विश्वासाची गरज नाही का? पश्चात्ताबद्दल काय? हे प्रश्न कदाचित आणल्या जातील आणि विचारात घेतल्या जातील, पण बाप्तिस्म्याच्या गरजेबद्दल कसलाच संशय होऊ शकत नाही, जर एखादा देवाच्या इच्छेचे सर्व सत्य स्वीकारणार असेल तर पेत्राने पेंटेकॉस्टच्या दिवशी लोकांना म्हटले की त्यांनी त्यांच्या पापांच्या क्षमेसाठी पश्चात्ताप करावा आणि बाप्तिस्मा घ्यावा (प्रे.कृ.२:३८). जरी विश्वासाबद्दल म्हटले नाही, तरीही जो प्रश्न तारणासाठी विचारला गेला ते स्पष्ट दर्शविते की त्यांनी आधीच विश्वास ठेवलेला होता. तरीही कोणता मुद्दा सुटला आहे ह्याकडे लक्ष न देता, प्रश्न हा आहे की काय विधान केल्या गेले ? ''पश्चात्ताप करा आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या...'' ह्या मुद्यावर वादविवादच होऊ शकत नाही. आपण सर्व ह्याचा स्वीकार करू या.

जरी आपण तारणाच्या योजनेला किंवा इतर विषयांना हाताळतांना आपण पवित्र शास्त्राच्या अभ्यासासाठी प्रत्येक वचनाच्या सर्व सत्याला स्वीकारीत आहोत आणि आपण प्रत्येक विधानातील प्रत्येक आज्ञा स्वीकारणार आहोत ह्या वृत्तीने सामोरे जायला पाहिजे.

हे स्पष्ट आहे की, एका वचनात किंवा काही वचनांमध्ये प्रभूने संपूर्ण सत्य दिलेले नाही. त्याचप्रमाणे त्याने सुवार्तेच्या संपूर्ण आज्ञा एका वचनात दिलेल्या नाही. कोणत्याही विषयामध्ये आम्हीएका वचनात किंवा दोन वचनात थांबू शकत नाही. परंतु आम्ही देवाच्या संपूर्ण वचनाचे वाचन आणि अभ्यास करून त्यामध्ये मेळ घालायला पाहिजे. कोणत्याही वचनामध्ये दिलेल्या संपूर्ण सत्याला आम्ही स्वीकारले पाहिजे आणि नंतर पुढील वचनाकडे आम्ही जायाला पाहिजे. असे केल्याने, सर्व काही जे प्रभूला आम्हाकडून अपेक्षित आहे ते आम्ही पाहू शकणार.

फक्त विश्वास ठेवण्याद्वारे आणि संपूर्ण त्याच्या आज्ञापालनाद्वारे आमचे तारण होऊ शकते. ह्यावर कसलाच वाद होऊ शकत नाही.

नक्कीच, आम्ही स्वत:ला अशा परिस्थितीमध्ये पाहत नाही की जेथे आम्हाला देवाच्या वचनावर जबरदस्तीने वाद घालावा लागतो न की आम्ही स्वत:ला अशा परिस्थितीमध्ये ठेवतो की जेथे आम्हाला काही  सत्याला नाकारावे लागते ह्यासाठी की काही श्रद्धेला आम्ही आधीच स्वीकारले आहे. जर आम्ही हे करतो, तर आम्ही सर्व वेळ गमावून बसू आणि शेवटी देवाच्या वचनाच्या भांगाचा नकार करण्याच्या निर्णयामुळे आपल्या आत्म्याच्या सार्वकालिक नाशासाठी कारण बनून जावू. मानवाच्या गर्वाची आणि हटवादीपणाची केवढी ही भयानक किंमत मोजावी लागेल ! किंवा कोणत्याही प्रकारची वृत्ती की जी आमची मने ज्या सत्याला आम्हाला स्वीकारायचे नाही, त्यासाठी बंद होण्यासाठी कारणीभूत होतात.

आमच्या प्रभूचे शब्द आम्ही स्मरणात ठेवण्यासाठी हे फार महत्वाचे आहे. ''जो मला अव्हेरितो व माझ्या वचनांचा स्वीकार करीत नाही त्याचा न्याय करणारा एक जण आहे; जे वचन मी सांगितले तेच शेवटच्या दिवशी त्याचा न्याय करील, कारण मी आपल्या मनचे बोललो नाही, तर मी काय सांगावे व काय बोलावे याविषयी ज्या पित्याने मला पाठविले त्यानेच मला आज्ञा दिली आहे. त्याची आज्ञा सार्वकालिक जीवन आहे हे मला ठाऊक आहे; यास्तव जे काही मी बोलतो ते पित्याने मला सांगितल्याप्रमाणे बोलतो'' (योहान १२:४८-५०).

देवाच्या संदेशाला बदलण्याचे धाडस आमच्या प्रभूनेही केले नाही. नक्कीच, कोणत्याही मानवाने ही गोष्ट करण्याचे धाडस करू नये.

● ● ●

# जेव्हा परमेश्वर ''नाही'' म्हणतो

**- जिम पोलॅन्ड**

**''ना**ही'' ह शब्द अनपेक्षित आणि सर्वात अखेरचा असा भासतो. जेव्हा आम्हाला जे पाहिजे ते मागतांना हा शब्द आम्हापैकी बहुतेकांना आवडत नाही. ह्याहूनही हे भयानक आहे की जेव्हा आमच्या प्रार्थनेच्या प्रतिवादाला देवाकडून ''नाही'' हे उत्तर येते.

काही वेळेस परमेश्वर ''नाही'' म्हणतो. तरीही ह्याचा अर्थ असा होत नाही की तो काळजी न करणारा किंवा प्रेम न करणारा आहे.

अंत:करण पिळवटून टाकणाऱ्या मार्गाने त्याने त्याचे प्रेम आम्हासाठी प्रदर्शित केले आहे. ''आपण दुर्बल असतानाच ख्रिस्त सुवेळी अभक्तांसाठी मरण पावला. नीतिमान मनुष्यासाठी कोणी मरणारा विरळा, चांगल्या मनुष्यांसाठी मरण्यास कदाचित कोणी धाडस करील; परंतु देव आपणावरच्या स्वत:च्या प्रीतीचे प्रमाण हे देतो की, आपण पापी असतानाच ख्रिस्त आपणासाठी मरण पावला.'' (रोम ४:६-८).



देवाने त्याच्या काही महान सेवकांना सुद्धा ''नाही'' म्हटले. देवाने प्रेषित पौलाला ''नाही'' म्हटले की ज्या माणसाने देवाची तारणारी प्रिती आणि जगासाठी कृपेच्या सुवार्तेच्या प्रचारासाठी सर्व काही सोडले होते. जेव्हा पौलाने त्याच्या शारीरिक आरोग्याच्या समस्येसाठी विनंती केली तेव्हा देवाने म्हटले, ''माझी कृपा तुला पुरे आहे कारण

अशक्तपणातच शक्ती पूर्णतेस जाते...'' (रोम १२:७-१०).

देव पित्याने त्याचा पुत्र येशूला सुद्धा ''नाही'' म्हटले. आपल्या सर्वांच्या पापासाठी जेव्हा येशू मृत्यूचा सामना करीत होतो तेव्हा त्याने तीन वेळेस प्रार्थना केली, ''हे माझ्या बापा, होईल तर हा प्याला माझ्यावरून टळून जावो; तथापि माझ्या इच्छेप्रमाणे नको तर तुझ्या इच्छेप्रमाणे होवो.'' (मत्तय २६:३६-४६).

जेव्हा देव ''नाही'' म्हणतो तेव्हा त्याच्याकडे कारण आहे आणि त्याची कारणे मानवाच्या कारणांपेक्षा अधिक उंचआहेत. ''कारण माझ्या कल्पना तुमच्या कल्पना नव्हे; माझे मार्ग तुमचे मार्ग नव्हेत असे परमेश्वर म्हणतो. कारण आकाश जसे पृथ्वीहून उंच आहे तसे माझे मार्ग तुमच्या मार्गाहून आणि माझ्या कल्पना तुमच्या कल्पनाहून उंच आहेत'' (यशया ५५:८-९).

• • •

**''मुलाच्या स्थितीस अनुरूप असे शिक्षण त्याला दे, म्हणजे वृद्धपणीही तो त्यापासून परावृत्त होणार नाही'' (नीतिसूत्रे २२:६).**



# जोखीम, प्रीति आणि यज्ञ

- चार्लस् आर. रोझ

**हे** सुरूवातीच्या काळातील होते, वास्तविक पाहता तसे आम्हाला कळते की हा वेळेच्या पूर्वीचा काळ आहे आणि त्यानंतरच मोजमापाला सुरूवात झाली. ख्रिस्त बाळाच्या जन्मापूर्वी जगाच्या इतिहासामध्ये अशी घटना होणार होती की ज्याचा पाया घालण्याची योजना पिता आणि पुत्र आखीत होते. ती घटना पवित्रशास्त्राच्या पहिल्या पुस्तकाच्या पहिल्या वचनात दाखविली आहे, ''प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली'' (उत्पत्ति १:१).

त्यांच्या योजनेमध्ये त्यांच्या प्रतिरूपाच्या मानवाची निर्मिती (उत्पत्ती १:२६), त्याचप्रमाणे बरे किंवा वाईट निवडण्याची योग्यता दाखविली होती (उत्पत्ती ३:५,२२) पुत्रासाठी हा निर्णय घेण्यात आला होता की तो देही मनुष्य बनून हरवलेल्या मानवजातीला पित्याकडे परत

घेऊन येईल. ''ज्याचे पूर्वज्ञान जगाच्या स्थापनेच्या आधी झाले होते, तोच काळाच्या शेवटी तुम्हासाठी प्रगट झाला'' (१ पेत्र १:२०).

**जोखीम :**

जेव्हा तो देहामध्ये येईल, तेव्हा येशूला मानवी जीवनाच्या प्रत्येक टप्प्याचा अनुभव ह्यामध्ये जन्म (मत्तय १८-२३, लूक २:१-७); जीवनाच्या सर्व बाजूने वाढणे (ते हे की, ज्ञानाने, शारीरिक रितीने, आत्मिकतेने आणि सामाजिकपणे) आणि आज्ञापालन शिकणे (इब्री ५:९). ह्याचा अनुभव घेणे गरजेचे होते. लक्ष द्या की हे काही पूर्वनिश्चित वास्तव नव्हते की सर्व काही जे पित्याने आज्ञापिले त्याची तो आपोआप आज्ञा पाळेल. मानव जातीसाठी जे आहे, ते सर्व तो शिकला होता. तसे आम्ही देवाच्या एकुलत्या एक पुत्राचे जीवन आणि मरण विचारपूर्वक न्याहाळतो तसे आम्हाला भयचकित करणारी जोखीम घेतल्या गेली हे समजले पाहिजे तेव्हा तो ''.....देवाच्या स्वरूपाचा असूनही देवाच्या बरोबरीचे असणे हा लाभ आहे असे त्याने मानले नाही, तर त्याने स्वत:ला रिक्त केले म्हणजे मनुष्याच्या प्रतिरूपाचे होऊन दासाचे स्वरूप धारण केले'' (फिलिप्पै २:६-७).

''जगाच्या स्थापनेच्या आधीच'' हा निर्णय घेण्यात आलेला होता, तेव्हाच त्याला सैतानाची ताकद आणि त्याचे मोहात पाडणे माहीत होते. स्वर्गात असताना तो देव जो पुत्र की, त्याच्या राज्यात त्याला मदतीसाठी सर्व स्वर्गीय समुदाय होता. पृथ्वीवर असताना त्याने ''सैतानाच्या डावपेचापुढे टिकाव धरला'' पाहिजे (इफिस ६:११) ह्याचप्रकारे इतर सर्व ''मनुष्यांनी'' टिकाव धरला पाहिजे. काय जर तो फक्त एकदाच, सैतानाच्या मोहाला बळी पडला असता ? तर परिणामच उद्ध्वस्त झाला असता. आदामापासून ते आमच्या पिढीपर्यंत आणि त्यानंतरचीही पिढी सैतानाच्या नरकात गेली असती. कारण त्याचेच

फक्त बलीदान सर्व प्रकारची आशा देणारी असती. जर सर्व मानवजाती जी बरेवाईट समजण्याच्या वयात आलेली फक्त एका पापाने डागाळल्या गेलेली असती (पहा अनुवाद १:३९); यशया ७:१६) तर देवाचा एकुलात एक पुत्र, नासोरी येशूला सुद्धा आशा नसती. म्हणूनच आण स्वर्ग सोडून आणि पृथ्वीवर येण्याच्या जोखमीचे प्रमाण पाहू शकतो.

**प्रीति :**

देव जो पुत्र ह्याने पत्करलेली जोखीम समजून घेतल्यावर मानवजातीसाठी दाखविलेली प्रीतीची मी फार अधिक प्रशंसा केली. तीन लेकरांचा बाप ह्या नात्याने मी तुम्हाला सांगतो की माझ्या मुलांपैकी कोणीही असे काही करीत असेल की ज्यामुळे त्यांचा सार्वकालिक आत्मा धोकादायक परिस्थितीमध्ये असेल तर मी त्याला तसे कधीच करू देणार नाही. अशाचप्रकारे आमच्या स्वर्गीय पित्यालाही तसेच करायची इच्छा आहे. कारण तो आम्हावर प्रीति करितो. त्याचे प्रेम मानवासाठी, की ज्याला त्याने जीवनाचा श्वास देऊन आपल्या प्रतिरूपाचे निर्माण केले (उत्पत्ती २:७), अतिशय सुंदर हे आहे की ''......त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे'' (योहान ३:१६).

त्याची निर्मिती हरविल्याबद्दल त्याला किती वेदना झाल्या असतील. जे लोक स्वत:ला वाचविण्यासाठी काहीच करत नाहीत त्यांच्याबद्दल त्याला किती किव वाटत असेल (यिर्मया १०:२३). किती अद्‌भुत प्रिती फक्त पित्याकडूनच नाही परंतु पुत्राच्याहीद्वारे देखील., ''देवाने आपल्या एकुलत्या एक पुत्राला जगात पाठविले आहे. ह्यासाठी की, त्याच्याद्वारे आपणास जीवन प्राप्त व्हावे; ह्यावरून देवाची आपल्यावरील प्रीति प्रगट झाली. प्रीति म्हणावी तर हीच, आपण

देवावर प्रीति केली असे नाही, तर त्याने तुम्हा आम्हावर प्रीति केली आणि तुमच्या आमच्या पापांचे प्रायश्चित्त व्हावे म्हणून स्वपुत्राला पाठविले.'' (१ योहान ४:९ ते १०) ''न्यायाच्या दिवसासंबंधाने आपल्या ठायी धैर्य असावे म्हणून त्याची प्रीति आपल्यामध्ये अशा प्रकारे पूर्णत्व पावली आहे...'' (१ योहान ४:१७).

होय, आम्ही त्याच्या न्यायासमोर धैर्याने...आश्वस्तपणे भीती किंवा संशय न धरता उभे राहू, कारण आम्ही त्याच्या आज्ञाचे पालन केले आहे (१ योहान ३:२१-२४).

**यज्ञ:**

आम्हाला ही खात्री आणि धैर्य आहे कारण आम्हाला त्याची प्रीति माहीत आहे त्याच्या यज्ञाचे महत्त्व समजले आहे. ''म्हणून तो जगात येतेवेळस म्हणाला, यज्ञ व अन्नार्पण यांची तुला इच्छा नव्हती, तू माझ्यासाठी शरीर तयार केले; होमांनी व पापाबद्दल अर्पणांनी तुला संतोष नव्हता. ह्यावरून मी म्हणालो, पाहा, हे देवा. ग्रंथपटात माझ्याविषयी लिहून ठेविले आहे. तुझ्या इच्छेप्रमाणे करण्यासाठी मी आलो आहे'' (इब्री १०:५-७). ''परंतु पापांबद्दल सार्वकालिक असा एकच यज्ञ अर्पूण हा देवाच्या उजवीकडे बसला आहे आणि तेव्हापासून 'आपले वैरी, आपले पदासन होईपर्यंत वाट पाहत आहे'' (इब्री १०:१२-१४).

'' म्हणून बंधुजनहो त्याने पडद्यातून म्हणजे स्वदेहातून जो नवीन व जीवनयुक्त मार्ग आपल्यासाठी स्थापित केला त्या मार्गाने परम पवित्र स्थानात येशूच्या रक्ताद्वारे प्रवेश करण्याचे आपल्याला धैर्य आले आहे आणि आपल्याकरिता 'देवाच्या घरावर एक'थोर याजक आहे; म्हणून आपली हृदये सिंचित झाल्याने दुष्ट भावनेपासून मुक्त झालेले व निर्मळ पाण्याने शरीर धुतलेले असे आपण खऱ्या अंत:करणाने व विश्वासाच्या

पूर्ण खात्रीने जवळ येऊ. आपण न डळमळता आपल्या आशेचा पत्कर दृढ धरू; कारण ज्याने वचन दिले तो विश्वसनीय आहे आणि प्रीति व सत्कर्मे करावयास उत्तेजन येईल असे एकमेकांकडे लक्ष देऊ. आपण कित्येकांच्या चालीप्रमाणे आपले एकत्र मिळणे न सोडता एकमेकास बोध करावा आणि तो दिवस जसजसा जवळ येत असल्याचे तुम्हाला दिसते तसतसा तो अधिक करावा'' (इब्री १०:१९-२५).

त्याने जोखीम पत्करली, त्याने प्रीति दाखविली आणि त्याने यज्ञ केला ''म्हणून माझ्या प्रिय बंधुंनो, प्रभूमध्ये तुमचे श्रम व्यर्थ नाहीत हे तुम्ही जाणून आहा; म्हणून तुम्ही स्थिर व अढळ व्हा आणि प्रभूच्या कामात सर्वदा अधिकाधिक तत्पर असा'' (१ करिंथ १५:५८).

• • •

''परंतु पापांबद्दल सार्वकालिक असा एकच यज्ञ अर्पूण हा देवाच्या उजवीकडे बसला आहे आणि तेव्हापासून 'आपले वैरी, आपले पदासन होईपर्यंत वाट पाहत आहे'' (इब्री १०:१२-१४).

''म्हणून माझ्या प्रिय बंधुंनो, प्रभूमध्ये तुमचे श्रम व्यर्थ नाहीत हे तुम्ही जाणून आहा; म्हणून तुम्ही स्थिर व अढळ व्हा आणि प्रभूच्या कामात सर्वदा अधिकाधिक तत्पर असा'' (१ करिंथ १५:५८).

# सहा दिवसांत निर्मिती

**- केविन एल. मुरे**

**सा**धारण २४ तासाच्या दिवसाऐवजी पुरोगामी तत्वज्ञ आणि उत्क्रांतीवादक तज्ञाप्रमाणे उत्पत्ती १ च्या निर्मितीचा प्रत्येक दिवसाचा लेखाजोगा कसलाही कालमापक सिद्धांताचा पुरावा न देता त्यांनी भूशास्त्रीय युगाप्रमाणे (दहा लाख वर्षे) दाखविला आहे.

ह्या सिद्धांताला नाकारून ह्या उताऱ्याला पृष्टी देण्यासाठी सहज सोप्या पद्धतीने समजण्यासाठी सहा सोपे कारणे दिली आहे.

१) जेव्हाही संख्यादर्शकाच्याद्वारे इब्री शब्द यॉम (''दिवस'') आधी येतो, तेव्हा ते सर्वदा सौर (२४ तास) दिवस संबंधित आहे. (उत्पत्ती १:५, ८, १३, १९, २३, ३१; गणना १३:२५; १४:३३-३४; निर्गम २०:९-११).

२) जुन्या करारात १०० पेक्षा जास्त वेळेस ह्या गोष्टींचा उल्लेख आलेला आहे ते वाक्य म्हणजे ''सध्याकाळ झाली व सकाळी झाली; हा पहिला दिवस'' (उत्पत्ती १:५) आणि सर्वदा २४ तासांच्या दिवसाच्या हे संबंधित आहे.



३) जर भूशास्त्रीय युगाप्रमाणे ''दिवस'' ह्या घटनेशी संबंधित आहे तर

तेव्हा प्रत्येक ''दिवस'' दहा लाख वर्षे सतत अंधकार आणि त्याचप्रमाणे दहा लाख वर्षे सतत प्रकाश राहिला असला.

४) सहाव्या आणि सातव्या दिवसापासून आदामाने जीवन व्यतित करायला सुरूवात केली (उत्पत्ती १:२६-२:३), परंतु तो भूशास्त्रीय युगाप्रमाणे जीवन जगला नाही (उत्पत्ती ५:५).

५) उत्पत्तीच्या वृत्तांतात हा निर्मितीचा नमुना नोंदविल्या गेलेला आहे की यहुदी लोकांना आज्ञा देण्यात आली होती की सहा दिवस काम करा आणि दर आठवड्यात एक दिवस विश्रांती घ्या (निर्गम २०:८-११).

६) जर देवाला सृष्टी निर्मितीचे विश्लेषण सहा शब्दश: २४ तासाच्या दिवसांमध्ये करण्याची इच्छा झाली असती तर कशाप्रकारे त्याने हा वृत्तांत स्पष्ट केला असता ?

• • •



# येशू रडला

## योहान ११:३५

- जे.सी.चोट

**ओळख :**

१) आम्ही सर्व पवित्रशास्त्रातील सर्वात लहान वचनाशी परिचित आहोत, ''येशू रडला'' (योहान ११:३५).

२) काही वेगवेगळ्या भाषांतरामध्ये पहा.

क) येशू ओक्साबोक्सी रडला. (मॉफट)

ख)''येशूचे अश्रू वाहले''. (गुड स्पीड)

ग) ''आणि येशू स्वत: रडत होता''. (बेसिक इंग्लिश)

घ) ''येशूच्या डोळ्यात पाणी आले''.(लिविंग बायबल)

३) रडणे कमजोरीचे प्रतिक नाही.

४) रडण्याचा अर्थ पुष्कळ गोष्टी आहेत.

क) हा व्यक्ती भावनांना समजू शकतो.

ख)त्याचे मन दु:खी झाले आहे

ग) कष्ट

घ) शोक

ड) व्यक्तीगत ओढ

च) पूर्ण विश्वास

छ) सहानुभूती

ज) सत्य

**चर्चा :**

१) येशू व्यक्तीसाठी रडला (योहान ११:१-४६).

२) येशू नगरासाठी रडला (मत्तय २३:२७, लूक १३:३४, लूक १९:४१-४८).

३) येशू पिढीसाठी रडला (लूक ७:३१-३५, योहान १:११).

४) येशूला जगाची काळजी होती,(मत्तय २६:३६-४६, लूक २३:४६, पेत्राचे पहिले पत्र २:२१, ३:१४-१८)

**निष्कर्ष :**

१) येशूला आमच्यापैकी प्रत्येकामध्ये आवड आहे आणि त्याला आमची काळजी आहे.


२) येशूला आपल्या लोकांद्वारे नेहमी नाकारल्यामुळे, नव्याने पुन्हा वधस्तंभावर जाऊन फार दु:ख होते.

३) जगाला हरविलेल्या स्थितीत पाहून त्याला दु:ख होते. ज्याच्या तारणासाठी तो मरण पावला.

४) संपूर्ण जगात सुवार्तेला घेऊन जाणाऱ्या त्याच्या आज्ञेला पूर्ण करण्यास आम्ही अपयशी राहिल्यावर त्याला होणाऱ्या दु:खाची कल्पना करा.

५) परमेश्वर आमचे साहाय्य करो की आम्ही आणखी समर्पित व्हावे, न की आपल्या तारणाऱ्याला दु:ख देणारे.

● ● ●



# सेवक वडील

**- जेरी बेट्स**

**मं**डळीच्या प्रारंभापासूनच देवाने नेमून दिले की तिला वडिलांच्या आणि सेवकांच्या (Deacons) द्वारे चालवावे. सर्व शतकांमध्ये मनुष्याने ह्या दैवी योजनेपेक्षा ह्याचा अनेक यंत्रणेमध्ये वापर केला. तथापि, ज्या मंडळ्यांची देवाची योजना अनुसरण्याची इच्छा आहे ते सतत वडील आणि सेवकांची जी साधारण योजना आहे त्याद्वारे चालविल्या जाते. ह्या विषयावरील प्रबंधामध्ये आम्हाला हा प्रश्न विचारात घ्यायचा आहे की, ''वडील मंडळीला कसे मार्गदर्शन करू शकतात ?'' मी सहमत आहे की अनेक वडील फार सजग आणि प्रामाणिकपणे देवाला जसे वाटते तसे त्या मार्गाने त्यांच्या आदरणीय मंडळ्यांचे मार्गदर्शन आणि देखरेख योग्य प्रकारे करतात. दुसऱ्या बाजूने सांगावयाचे झाल्यास तर काहीजण चुकीच्या मार्गाने किंवा चुकीच्या उद्देशाने मार्गदर्शन करतात.

पुढारीपण हे भययुक्त जबाबदारी आहे. पवित्रशास्त्रामध्ये काही झोंबणारे शब्द पुरुषांसाठी राखून ठेवले आहेत की जे पुढारी व्हायला

पाहिजे होते पण झाले नाहीत. यहेज्केल ३४:१-६ मध्ये दुष्ट मेंढपाळाचे चित्र रंगविले आहे आणि यशयाने इस्त्राएलाच्या पुढाऱ्यांचे असे वर्णन केले आहे की ते आंधळे पहारेकरी आणि न भुंकणारे कुत्रे आहेत (यशया ५६:९-१२). मत्तय २३ मधील येशूच्या शब्दांकडे लक्ष द्या की ज्यामध्ये शास्त्री आणि परूष्यांविषयी धिक्कारांची मालिका आम्हाला आढळते. ह्या यहुदी पुढाऱ्यांनी नितीमत्वाचे उदाहरण असायला पाहिजे होते. तथापि, त्या एकाच अध्यायामध्ये आठ वेळा येशूने त्यांना ढोंगी म्हटले आहे. स्पष्टपणे हा काही आदर्श एखाद्याने अनुसरण्याचा नाही.

काही लोक व्यवसायासारखे आदर्शाने पाहतात की ज्यामध्ये वडिलांनी मार्गदर्शन करावे. वडील संचालक मंडळाप्रमाणे, मंडळीवर नियंत्रण करण्याचा प्रयत्न करतात आणि साहेबासारखी कृती करून संपूर्ण मंडळीने ते पाळावे असे निर्णय घेतात. ते कार्य करण्यासाठी वेगवेगळे सेवकवर्ग भाड्याने घेतात आणि जर त्यांनी इच्छित परिणाम साधला नाही तर त्यांना बदलल्या जाते. तरीपण हा वरील आदर्श पवित्रशास्त्रीय नाही. मेंढपाळ अध्यात्मिक पुढारी आहे आणि त्याचे कळपासोबत नाते आहे हे पवित्रशास्त्रामध्ये लाक्षणिक प्रभावाने वापरण्यात आले आहे. ५०० पेक्षा अधिक वेळा हे वापरल्या गेले आहे. येथू मुख्य मेंढपाळ आहे आणि आजच्या आत्मिक पुढाऱ्यांनी ख्रिस्ताचे अनुकरण त्याच्या प्रेमळ सेवेने आणि खऱ्या नात्याने करावे. हे सेवकावर मालक असण्याचे नाते नसावे, तर प्रेमाचे आणि सेवेचे असावे.

मेंढपाळ आणि मेंढरांची कल्पना वडील आणि मंडळीचे नाते दर्शविण्यासाठी तीन बाबींचा उल्लेख केलेला आहे. पहिले हे की, वडील उपलब्ध असायला पाहिजे. जसा मेंढपाळ आपल्या मेंढरासमवेत अधिक वेळ घालवितो, तसाच वेळ नातेसंबंध वाढविण्यासाठी अध्यात्मिक कळपासमवेत घालवावा. दुसरे असे की, मेंढरांना कसल्याही प्रकारची

गरज असेल, तेव्हा मेंढपाळ त्याचा पुरवठा करण्याचा प्रयत्न करतो. तशाचप्रमाणे वडिलांनी सुद्धा कळपाच्या अध्यात्मिक उन्नतीसाठी समर्पित असायला पाहिजे. वडिलांनी मेंढरांच्या कमतरतेबद्दल निर्णय घेऊ नये, तर त्याने कळपाचा दोष आणि उणेपणावर फार मोठी दया दाखवावी. सरतेशेवटी काही काळानंतर भरवसा प्राप्त करून पक्का करणे होय. मेंढरे मेंढपाळावर भरवसा ठेवितात आणि मंडळीने वडिलांवर भरवसा ठेवायलाच पाहिजे. तरीसुद्धा हा भरवसा मिळविता आला पाहिजे आणि नक्कीच हा भरवसा त्याने वडील बनण्यापूर्वीच प्राप्त करायला हवा. आम्ही येशूवर भरवसा ठेवितो कारण आम्हाला माहीत आहे की तो त्याचे अभिवचन पाळीतो, तशाचप्रमाणे वडिलांनी सर्व प्रमाणात भरवसालायक असायला पाहिजे.

वडील कळपांसाठी कित्ता आहेत. काही लोकांचे म्हणणे आहे की वडिलांना खरा अधिकार नाही आणि त्यांनी फक्त स्वत:च्या उदाहरणांनी मार्गदर्शन करावे. ही कल्पना त्यांचा अधिकार कमी करते व त्यांनी कसे कार्य करावे हे दर्शविते. कोणीतरी म्हटले, ''जेव्हा एखाद्या व्यक्तीला त्याचा अधिकार ठासून सांगावा लागतो तेव्हा त्याचा असाच अर्थ होतो की त्याला फार कमी अधिकार आहे.'' जेव्हा वडील हे योग्य कित्ता असतात तेव्हा इतरांना त्यांचे पुढारीपण आनंदाने अनुसरावे वाटते. इतरांनी काय करावे हे सांगणेच फक्त त्यांचे कार्य नाही. परंतु कशा प्रकारे जगावे आणि देवाचे कार्य कसे करावे हे त्यानी इतरांना दाखवणे सुद्धा आहे. त्यांचे कार्य मदतनिसांचे आहे, जसे की कशाप्रकारे येशू त्यांच्या शिष्यांसोबत संबंधीत होता.

येशूने म्हटले, ''परराष्ट्रीयांवर त्यांचे अधिपति प्रभूत्व चालवितात व मोठे लोकही अधिकार करितात हे तुम्हास ठाऊक आहे. तसे तुम्हामध्ये नाही, तर जो कोणी तुम्हामध्ये श्रेष्ठ होऊ पाहतो तो तुमचा सेवक

होईल, आणि जो कोणी तुम्हामध्ये पहिला होऊ पाहतो तो तुमचा दास होईल. ह्याप्रमाणे मनुष्याचा पुत्र सेवा करून घ्यावयास नाही, तर सेवा करावयास व पुष्कळांच्या खंडणीसाठी आपला प्राण अर्पण करण्यास आला आहे'' (मत्तय २०:२५-२८). एखाद्याला जगण्यासाठी मदतनीसाचा नमुना हा होय. १ करिंथ ११:१ मध्ये लिहितांना पौलाने ह्यासारखेच म्हटले आहे की, ''जसा मी ख्रिस्ताचे अनुकरण करणारा आहे तसे तुम्हीही माझे अनुकरण करणारे व्हा.'' मदतनीस उत्तेजन देतात आणि त्यांना माहीत आहे की इतरांना कशाप्रकारे येशूकडे आणावे.

देवाच्या उत्तम सेवेकरिता वडिलांनी इतरांना सुद्धा सज्ज करावे. (इफिस ४:१२). सज्ज करणे म्हणजे लोकांना फक्त काम पाहून देणे नाही तर त्याचा अर्थ असा होतो की लोकांना त्यांच्यातील ज्ञान आणि योग्यता वाढविण्यासाठी मदत करेण होय. जेव्हा प्रत्येक सदस्य योग्य प्रकारे सुसज्ज होतो आणि प्रभूसाठी कार्य करितो तेव्हा शरीर संख्येने आणि आत्मिकरितीने वाढते.

एक शेवटचे कार्य आणि सर्वात महत्त्वाचे कार्य असणारे ते म्हणजे त्याला आपण संरक्षण हे म्हणावे. जशा प्रकारे मेंढपाळ जंगली प्राण्यांपासून मेंढरांचे संरक्षण करितो, त्याचप्रमाणे, वडिलांनी अध्यात्मिकरित्या कळपाचे संरक्षण करावे. पौलाने इफिस येथील वडिलांना चेतावणी दिली की, ''....क्रूर लांडगे तुम्हामध्ये शिरतील हे मी जाणून आहे. तुम्हापैकीही काही माणसे उठून शिष्यांना आपल्यामागे ओढून घेण्यासाठी विपरीत गोष्टी बोलतील म्हणून....सावध राहा'' (प्रे.कृ.२०:२९-३१). वडिलांचे कार्य हे आहे की आतील आणि बाहेरील खोट्या शिक्षणापासून कळपाचे रक्षण करणे होय. ह्यासाठी फार मोठ्या धैर्याची त्याचप्रमाणे विचारविनीमय आणि इतर वेगळ्या साधारण मार्गाने खोटे सिद्धांत ओळखण्यासाठी बुध्दीची आणि ज्ञानाची गरज

लागते.

वरील संपूर्ण कार्य करणे हे एक महत्त्वपूर्ण कार्य आणि अद्भूत जबाबदारी आहे. प्रभूसाठी काम करणे हे इतर कामापेक्षा फार श्रेष्ठ आहे. ''कोणी अध्यक्षाचे काम करू पाहतो तर तो चांगल्या कामाची आकांक्षा धरितो'' (१ तिमथी ३:१) आणि तो मोठ्या सम्मानासाठी आणि उत्तेजनासाठी योग्य आहे.

• • •

मत्तय २३ मधील येशूच्या शब्दांकडे लक्ष द्या की ज्यामध्ये शास्त्री आणि परूष्यांविषयी धिक्कारांची मालिका आम्हाला आढळते. ह्या यहुदी पुढाऱ्यांनी नितीमत्वाचे उदाहरण असायला पाहिजे होते. तथापि, त्या एकाच अध्यायामध्ये आठ वेळा येशूने त्यांना ढोंगी म्हटले आहे. स्पष्टपणे हा काही आदर्श एखाद्याने अनुसरण्याचा नाही.

# नवीन कराराच्या ''अंत:करणाचे'' संक्षिप्त अध्ययन

**- होलीस मिल्लर**

**न**व्या करारातील लेखकाने आतील मनुष्याची गोष्ट करते वेळी वारंवार अंत:करण ह्या शब्दाचा उपयोग केला. त्याचे पाठक या गोष्टीला समजत होते, या शब्दामध्ये त्यांची गोडी, भावना, इच्छा, त्यांचे म्हणने म्हणजे त्यांचा आतील मनुष्य आहे. जेव्हा येशूने सांगितले की, अंत:करणातून दुष्ट कल्पना, खून, व्यभिचार, जारकर्मे, चोऱ्या, खोट्या साक्षी, शिव्यागाळी ही निघतात, तर तो या गोष्टीची पुष्टी करत होता की पापाची सुरूवात मनुष्याच्या आतूनच होते (मत्तय १५:१९). हे सत्य आहे म्हणून या कारणाने कोणी आश्चर्य करू शकतो काय की नवीन कराराच्या शिक्षणात अंत:करणावर इतका जोर का दिला आहे ?

मंडळीच्या वाढदिवसाच्या दिवशी (पेंटेकॉष्ट) कित्येक यहुदीयांचे जे येशूचा विरोध करीत होते त्याच्या अंत:करणात चुटपूट लागली होती किंवा कापले होते. जेव्हा प्रेषितांच्या प्रचार केल्याने त्यांना विश्वास आला की त्यांनी आपल्या ख्रिस्तालाच वधस्तंभावर चढविले (प्रेषितांची कृत्ये २:२७). तोच ज्यांच्यासाठी त्याचे अंत:करण तळमळत होते, जेव्हा त्यांच्याजवळ आला, तर त्यांनी त्याला नाकारले होते. (योहान १:११).

पौलाने व्यक्तीच्या विश्वासात अंत:करणाच्या निर्णायक भूमिकेला समजले आणि या गोष्टीची पुष्टी केली आणि या गोष्टीसाठी पुढे जाऊन लोक याद्वारेच विश्वास करतात (रोमकरास पत्र १०:९-१०) सुवार्तेला मन आणि बुद्धीने ग्रहण करून समजल्या जाते, परंतु जर हे अंत:करणात जाणार नाही तर हे आपले कार्य पूर्ण करू शकणार नाही.

अंत:करणच आहे ज्यावर परमेश्वर आपली व्यवस्था किंवा नवीन

करार लिहितो (इब्री ८:८-१२, यिर्मया ३१:३१-३४), हे पण होऊ शकते कोणी बुद्धीने, परमेश्वराच्या वचनाला जात असेल परंतु हृदय त्याच्यामध्ये सामील नसेल तर असे झाल्याने आतील मनुष्य पित्याचे प्रेम आणि कृपेपासून अप्रभावित राहतो. प्रभू आणि त्याच्या प्रेषितांना माहीत होते की, कोणाला परमेश्वराच्या सेवेसाठी तयार करायला हृदयाच्या सहमतीशिवाय बुद्धीला समजाविणे कामाचे नाही. म्हणून येशूने एका शास्त्रीच्या सांगण्याला पूर्ण मंजुरी दिली की मनुष्याने आपल्या पूर्ण मनाने, जीवाने, सामर्थ्याने, बुद्धीने प्रेम करणे आवश्यक आहे (लूक १०:२५-२८).

• • •

जेव्हा येशूने सांगितले की, अंत:करणातून दुष्ट कल्पना, खून, व्यभिचार, जारकर्मे, चोऱ्या, खोट्या साक्षी, शिव्यागाळी ही निघतात, तर तो या गोष्टीची पुष्टी करत होता की पापाची सुरूवात मनुष्याच्या आतूनच होते (मत्तय १५:१९).

# आनंदीत असा

**- डालटन की**

**ख्रि**स्ती मित्राणों, काय तुम्ही हसणे विसरला आहात ? काय तुमच्या चेहऱ्यावर निराशा असते? काय तुम्ही अनोळखी व्यक्तींवर भुवया चढविता? आणि मित्र आणि परिवराशी उद्धटत बोलता? जर तुमच्यासाठी या गोष्टी लागू होतात तर कृपा करून हा लेख वाचा. जर नाही तर आरशासमोर जावून आपल्या स्वत:ला पाहा आणि स्वत:चा निर्णय घ्या.

या पृथ्वीवर आनंदी राहण्याचे जर काही कारण आहे तर ते परमेश्वराची संतान होणे म्हणजेच ख्रिस्ती बनणे होय. ख्रिस्ती व्यक्तीला येशूच्या रक्ताद्वारे सोडविण्यात आले आहे. त्याला एक नवीन सृष्टी बनविले आहे. तो परमेश्वराला पित्याच्या रूपात आणि ख्रिस्ताला मुक्तीदात्याच्या रूपात पाहतो आणि ''स्वर्गीय स्थानात सर्व प्रकारचे आत्मिक आशीर्वादाचा'' आनंद घेतो (इफिसकरास पत्र १:३). ख्रिस्ती व्यक्तीला चारण्यासाठी एक मेंढपाळ आहे, त्याच्या मार्गदर्शनासाठी

प्रकाश, त्याला प्रोत्साहीत करण्यासाठी सोबत पवित्र लोकांची बंधुप्रिती आणि स्वर्गात एक घर त्याची वाट पाहत आहे. ख्रिस्ती व्यक्तीला ख्रिस्ताकडून ''जीवन'' मिळाले आहे आणि ते जीवन ''विपुलपणे'' आहे (योहान १०:१०). आश्चर्याघी गोष्ट नाही की परमेश्वराची प्रेरणा पावलेले लेखक ख्रिस्ताच्या शिष्यांना ''सदा आनंदीत'' आणि ''प्रभुमध्ये सर्वदा आनंदित'' राहण्यासाठी सांगत होते. (येस्सलनिकाकरास पहिले पत्र ५:१७), फिलिप्पैकरास पत्र ४:४).

आनंदीत होण्यासाठी एवढे असूनही आम्ही प्रसन्न का नाही? असे तर नाही की आम्ही आमचा वेळ आतमध्ये किंवा स्वत:ला पाहण्यासाठी घालवतो परंतु आपले लक्ष वरती म्हणजे परमेश्वराकडे आणि बाहेर म्हणजे आपल्या मित्रांकडे पाहण्यासाठी असले पाहिजे? आपल्यावर लक्ष दिल्याने आपण सुंदर दृष्याला गमावितो. आपले लक्ष त्या उणीवकडे जाते जे दुसऱ्यामध्ये आहे. आम्हाला वाटते की, पक्षपाती जगाद्वारे आम्हाला अनोळखी केल्या गेले, आमच्यासोबत दुर्व्यवहार केला गेला आणि वाईट केल्या गेले आहे.

याचे उत्तर ? वर पहा. स्वर्गाने आम्हाला आमच्या समजण्यापलीकडील आशीर्वादाने आशीर्वादीत केलेले आहे. जे काही तुमच्याजवळ आहे त्याच्यासाठी उपकार माना, परमेश्वराच्या चांगुलपणामध्ये आनंदीत असा आणि बाहेर पहा. दुसऱ्यांच्या आवश्यकतेकडे पाहा. येशूच्या नमुन्याचे अनुकरण करा की ज्याने म्हटले, ''याप्रमाणे मनुष्याचा पुत्र सेवा करून घ्यावयास नाही, तर सेवा करावयास व बहुतांच्या खंडणीसाठी आपला जीव द्यावयास आला'' (योहान १३:४-१७, मत्तय २०:२८).

• • •

# प्रथम व शेवटचे

**- बॉब पलंकट**

**ए**खाद्या उत्पादाचा विश्वास उत्पन्न करणाऱ्या तर्कामध्ये एक पहिले आणि नंतरचा प्रभाव असतो. ह्याला तुम्ही समाचार पत्रात किंवा दूरदर्शनात पाहता ते कित्येक वेळेस केस नसलेला मनुष्य दाखवतात आणि नंतर नवीन केस उगवल्यानंतर तो कसा दिसतो अनेक वेळा तो फार छान दिसतो. (कित्येक वेळेस तो पहिल्यापेक्षा वाईट दिसू लागतो).

परमेश्वराच्या वचनाच्या सामर्थ्यासाठी आपल्याला कसे प्रमाण पाहिजे? पौलाने येशूबरोबर पहिले आणि नंतर असण्याची गोष्ट केली ''पूर्वी मी जो निदंक, छळकरणारा व उपद्रव देणारा होतो त्या मला त्याने विश्वासू मानून आपल्या सेवेकरिता ठेविले, मी असा होतो तरी अविश्वासामुळे न समजून ते केले, म्हणून मजवर दया झाली''(तिमथ्याला पहिले पत्र १:१२,१३) पौलामध्ये झालेले परिवर्तन इतके नाटकासारखे होते की कित्येकांना यावर भरवसा वाटला नाही. यावरून लोक प्रश्न विचारू लागले त्यामुळे पौलाला सांगण्याची संधी मिळाली, की त्याचं जीवन कसे परिवर्तीत झाले. दावीद म्हणतो की ''पहिले मी दु:खी होतो, मी भटकत होतो, परंतु आता मी तुझे वचनाचे पालन करितो.'' दावीद आपली पहिली आणि नंतरची स्थिती दाखवित आहे. मार्क अशुद्ध आत्म्याने ग्रस्त असलेल्या मनुष्याबद्दल सांगतो, जो कब्रेमध्ये राहत असे, लोक त्याला साखळदंडाने आणि बेड्यांनी बांधित असत, परंतु तो त्यांना चूर चूर करीत असे, दगडाने तो आपल्या शरीरावर जखमा करून घेत असे, पण येशूमध्ये आल्यावर तो येशूच्या पायाजवळ बसून शुद्धीवर होता आणि कपडे घातलेला होता (मार्क ५:१पासून).

परमेश्वराजवळ आमच्या प्रत्येक जणांचे पहिले आणि नंतरचे, चित्र आहे. काय तो तुमच्या विकासाबद्दल प्रसन्न आहे ? तुम्ही येशूद्वारा केलेले एक चांगली शिफारस आहात काय? पेत्राने त्या पुरुषांची आणि स्त्रियांची गोष्ट केली जे पहिल्यापासून वाईट स्थितीमध्ये होते आणि ही किती खतरनाक स्थिती होती पेत्राने म्हटले की, ''आपल्या ओकीकडे परतलेले कुत्रे' व गाळात लोळण्यास अंग धुतल्यानंतर परतलेली डुकरीन'' (पेत्राचे दुसरे पत्र २:२०-२२).

लक्षात असू द्या, की ख्रिस्ती व्यक्तीच्या जीवनाचे प्रमाण हेच आहे- हे नाही की पवित्र शास्त्र तुम्हाला किती माहीत आहे, आणि हे नाही की किती आराधना सभेत तुम्ही जाता, हे नाही की तुम्ही किती आराधना सभा करता, परंतु हे की तुम्ही येशूसारखे किती आहात? प्रारंभीच्या मंडळीसाठी म्हटल्या जात होते की, ''हे येशूच्या सहवासात होते असेही त्यांनी ओळखले'' (प्रेषितांची कृत्ये ४:१३).

• • •

''पूर्वी मी जो निदंक, छळकरणारा व उपद्रव देणारा होतो त्या मला त्याने विश्वासू मानून आपल्या सेवेकरिता ठेविले, मी असा होतो तरी अविश्वासामुळे न समजून ते केले, म्हणून मजवर दया झाली''(तिमथ्याला पहिले पत्र १:१२,१३)



# आशीर्वाद

**- एडविन वाईन**

**आ**गस्टीनने एकदा टिपनी केली होती की, ''परमेश्वराचा एक पुत्र या पृथ्वीवर पाप विरहित होता, परंतु दु:खाशिवाय आतापर्यंत कोणी नाही. ''जीवन आमच्यातील कोणासाठीही फुलांचीं चादर नाही. ईयोब म्हणतो, ''स्त्रीपासून जन्मलेला मानव प्राणी अल्पायू व क्लेशभरित असतो (इयोब १४:१). मनुष्य सदैव भट्टीत राहतो. प्रत्येक जीवनाला आकार त्याच्या परीक्षेमुळे आणि दु:खाने मिळते.

मी पाहिले की दु:खच असे आहे की जे एखाद्याला कमजोर आणि बलवान करू शकतो. वाळूवर बांधलेले घर चांगल्या हवामानामध्ये खडकावर बांधलेल्या घरासारखे फार चांगले वाटते, फरक तेव्हा माहीत होतो जेव्हा पाऊस पडतो, वादळ येते. जर तुम्हाला माहीत करून घ्यायचे की ह्याचा आधार मजबूत प्रतीत होतो किंवा खराब तर तुम्हाला याला तेव्हा पाहावे लागेल जेव्हा याच्यावर भार टाकला जाईल. कातिनीचे जाळे तारेसारखे तोपर्यंत मजबूत प्रतीत होते जोपर्यंत त्यावर काही भार पडत नाही. खरोखर गुणी व्यक्ती चांगल्या धातूसारखी असते की जिला जितक्या जास्त आगीत तापविल्या जाईल तितकीच ती चमकते. परमेश्वर

त्या रत्नांना ज्यावर तो विशेष रूपात प्रेम करतो आणि त्यांना कित्येक धारदार हत्याराने किंवा खडबडीत रेतीन धारदार बनविण्यास पाहतो, चमकवितो. हिरा ज्याला अधिक पैलू पाडल्या गेले आहे तोच अधिक चमकतो. स्वर्गात घातलेला सर्वात चमकदार मुकट तेच लोक होतील ज्यांना छळाच्या भट्टीमध्ये पारखल्या गेले, पैलू पाडल्या गेले, चमकविल्या गेले.

ख्रिस्ती आशीर्वादामधून पहिला आशीर्वाद आहे की ज्याचे हृदय भग्न झाले आहे. परमेश्वर आपल्या लेकरांचा छळ होऊ देतो, परंतु तो त्याचा उद्देश सांगतो, ''धीराचा परिणाम कसाला लागणे; कसाला लागण्याचा परिणाम आशा.'' (रोमकरास पत्र ५:८). येशूसाठी परिवर्तनाचा पर्वत वधस्तंभाच्या मार्गात आहे. पृथ्वीवर वधस्तंभ उचलणारा व्यक्ती स्वर्गात मुकूट घालणारा बनेल.

• • •

**नकारात्मक भेट**

हे पित्या, त्या अश्रूंसाठी, भावनांसाठी हृदयात ओझे आणि गळ्यात तळमळीसाठी तुझे उपकार. त्या काळजीसाठी ज्या रात्रंदिवस आम्हाला जागरण करवतात आणि वारंवार प्रार्थनेच्या द्वारे आवाज देण्यासाठी मागणी करतात. परेशानी आणि निराशेच्या समयासाठी धन्यवाद !

जर हे उपहार नसते की जे इतके नकरात्मक वाटतात तर आम्ही उन्नती कशी केली असती ?

**बेट्टी बर्टन चोट**



# संतुष्ट असावे

**- सी.डब्ल्यू. ब्रेडली**

**आ**म्ही सर्व त्या लोकांना ओळखतो ज्यांनी त्यांच्या आपल्या महत्वाच्या अवधारनेला वाढविले आहे. त्यांनी त्यांच्या योग्यतेला काही अधिकच मानले आहे. वास्तविक आम्हाला त्यासाठी दु:ख होते आणि आम्ही प्रार्थना करतो की कोणत्या ना कोणत्या प्रकारे आम्ही त्यांना थोडेसे विनम्र बनविण्यास सहायता करू शकू. पवित्र शास्त्र सांगते की, ''मानावयास योग्य त्यापेक्षा स्वत:ला अधिक मानू नका'' (रोमकरास पत्र १२:३).

परंतु त्यांच्यासाठी जे स्वत: जे ते आहेत त्यापेक्षा कमी समजतात आणि आपल्या योग्यतेला कमी लेखतात, ह्यापेक्षाही मोठा धोका होऊ शकतो, आम्हामधून अधिक लोकांसाठी हे मानणे कठीण होऊ शकते की, परमेश्वराने आम्हाला ती योग्यता दिली आहे जी तो आमच्याकडून करून घेऊ इच्छितो.

आमच्यातील अधिक तर लोकांसाठी आपल्या प्रति दिवसाच्या जीवनात येणाऱ्या प्रत्येक समयाला नजरअंदाज करणे आणि काही विशेश असाधारण वेळेची वाट पहात राहणे सोपे आहे. जो पर्यंत आम्ही

त्या वेळेची जी आमच्याजवळ आहे, उपयोग करण्याची सुरूवात करत नाही, तर आम्हाला परमेश्वराकडून आपल्यासाठी मोठमोठ्या वेळेची भिंत उघडायची अपेक्षा कशाला करायला पाहिजे ?

येशूने म्हटले ''जो अगदी अल्प गोष्टीविषयी विश्वासू तो पुष्कळाविषयीही विश्वासू आहे आणि जो अगदी अल्प गोष्टीविषयी अन्यायी तो पुष्कळाविषयीही अन्यायी आहे'' (लूक १६:१०).

माझ्या स्वत:च्या अवलोकनाने मला हा विश्वास दिला आहे की, सामान्य जीवनात किंवा परमेश्वराच्या सेवेत मोठी सफलता मिळविणारे ते लोक नाहीत ज्याच्यामध्ये स्वाभाविक योग्यता असेल. साधारणपणे जी सफलता आमच्याजवळ आहे त्याने मोजल्या जात नाही, परंतु या गोष्टीने मोजता येते की आपण त्याचा उपयोग कसा केला आहे.

फार मोठी योग्यता आणि बुद्धी असणे फार मोठी गोष्ट नाही. कमी योग्यता आणि कमी बुद्धी असणे अपमानाची गोष्ट नाही. आमचा न्याय या गोष्टीने होईल की, आम्ही त्याचा उपयोग कसा केला जे आमच्याजवळ होते.

परमेश्वर करो की, आम्हा सर्वांना बुद्धी आणि समजदारी येवो, की जे आपल्याजवळ आहे त्याचा उपयोग ख्रिस्ताच्या मंडळीला बनविण्यासाठी व साहाय्य करण्यासाठी करायचा आहे, जे काही आमच्याजवळ नाही त्याच्यासाठी आपल्या स्वत:ला दोष देण्यात वेळ वाया घालू नये. परमेश्वर करो की आमच्यातील प्रत्येकाला आपला प्रकाश चमकवता आला पाहिजे...'' तुम्ही तुमच्या छोट्याशा कोपऱ्यात आणि मी माझ्या कोपऱ्यात.''

• • •

# फक्त एक वेळेस

**- मॅल्कोम जेम्स मेक्लॉड**

**या** जगातून मी फक्त एक वेळेस जाईल. यासाठी कोणताही चांगुलपणा, जो मी करू शकतो किंवा कोणतीही दया जी कोणत्या मानवीय जीवावर दाखवू शकतो, मला आता दाखवू द्या. मी याला टाळणे किंवा कानाडोळा करू इच्छित नाही कारण येथून मी दुसऱ्यांदा जाणार नाही.

आपल्या अंत:करणाला द्वेषापासून आणि आपल्या मनाला चिंतेपासून दूर ठेवा. साधे जीवन व्यतीत करा, अपेक्षा कमी ठेवा, गीत अधिक गात रहा, प्रार्थना निरंतर करा. आपल्या जीवनाला प्रेमाने भरा. सूर्याचा प्रकाश पसरून टाका, स्वत:ला विसरून जा. दुसऱ्यांबद्दल विचार करा. तसा व्यवहार करा की जसा तुम्ही इच्छिता, जसा तुमच्याबरोबर केल्या जावा.

संतुष्टीच्या सोन्याच्या साखळीच्या या पारखलेल्या कड्या आहेत.

• • •

आम्ही तुम्हाला विभिन्न भाषांतील सुवार्ता घोषणेच्या प्रयत्नामध्ये लांभांकित व्हावे ह्यासाठी उत्तेजन देत आहोत.

## T.V./ Radio Program/ Magazine / Bible Courses

**GRACIOUS WORD** **TAMIL**

Speakers : **Philemon & Kingsly Rajah**
T.V. Program : **Nambikki TV-** Friday 6-15 a.m.
**Tamilan TV-** Sunday 6-45 a.m.
Magazine : Kirubaiyulla Vaarthai (Monthly Tamil)
The Voice of Truth Intl. (English Qtly.)
Bible corres.Course : Basic and Advanced Bible
**Correspondence Courses (Tamil & English)**
**J.C. School Of Evangelism** : Training faithful men and women for Evangelism @ their Place

Online Bible Course@ : **www.graciousword.org.(Tamil&English)**

**God's word to the Visually Challenging People**

-The Voice of Truth International Braille Edition,Tamil& English-Free
- Braille Bible Lessons, Tamil& English-Free
- Free MP3 Player Audio Bible for Blinds,Different Languages-Free

**For more information and Bible Course, write to**

Church of Christ, Post Box 15, Arasaradi, Madurai-625016.
Tamilnadu (India) Cell : 92 4421, 4421, 92 4431 4431
Email : obey2jesus@gmail.com Visit : www.graciousword.org

---

**SATHYA VAZHI**

Speakers : **P.R. Swamy (Evangelist)**
Radio Program : Sunday to Wednesday 5.30 p.m.
Srilanka All Asia Service-25 & 49 Meter band
Magazine : Sathya Vazhi (Tamil)
Programs : Bible School & Bible Corres. Courses

**For more information write to**
**"Sathya Vazhi",** Post Box 8405, Bengaluru - 560 084
Phone : 080-25463507 Cell : 098440 70763
Email : prsdoug@hotmail.com

**THIRUMARAI AASAN**

Speaker : **Rajanayagam**
T.V. Program : **Tamilan T.V.**-Monday 7.00 a.m.
Thursday 9.30 p.m. & Saturday 7.15 a.m.
Magazine : Thirumarai Aasan (Monthly)
Tamil Qtrly Magazine : "Sathiyathin Kural" (TVOTI- Tamil)
Advanced Bible Correspondence Course Available in Tamil

**For more information write to**
**Church of Christ,** Post Box 27, Dharapuram Road,
Kangeyam - 638701 Cell : 9842730382

**THE WORD OF CHRIST**

Speaker : **B. Arjunan**
T.V. Program : **Tamilan T.V.**-Monday,Saturday7.30 -7.45a.m.
Magazine : The word of Christ (Monthly)
Radio Program : SW25 & 41m (Saturday 5.30 to 5.45 p.m.)
Srilanka All Asia Service

**For more information write to**
**The Word of Christ,** Post Box 5, Batlagundu - 624206.
Dindigul Dist. Cell : 9443558041

**SATYAVANI** **TELUGU**

Speakers : **Joshua & Ricky Gootam**
T.V. Program : **Subhavartha Channel** Sunday 6.00 p.m.
**Rakshana Channel**
Wednesday 6.30 p.m. Thursday 11.00 a.m.
Satyavani T.V. Online : www.sakthitv.in
Every Wednesday & Friday at 8.00 p.m.

**MALAYALAM**

Speaker : **P.K. Vargheese**
T.V. Program : **Jai hind Channel**
Every Saturday 6 a.m. to 6.30 a.m.
Magazines : Bible Truth - Monthly
& Truth for Today (Bi-monthly)

**For more information & Bible course write to**
**Church of Christ,** Tampuranmukku, Trivandrum- 695 035.
Phone : 0471 - 2303378, Cell : 9447035465

**HINDI**

T.V. Program : **Shubh Sandesh Hindi Channel**
Every Sunday, Tuesday 7.00 pm to 7.30 pm
Speakers : **Sunny/ Francis/ Vinay David**
Magazine : **English Bible Teacher - Sunny David**
E-mail : sunny_davidin@yahoo.co.in
Cell : 09810896789
**Hindi Bible Teacher - Francis David,**
Email : davidfrancis53@rediffmail.com
Cell : 09911916932
Bible Courses : **Hindi & English - Vinay David**
Emai: vinay_david2002@yahoo.co.in
Cell : 09911719517
Church meets at: C.R. Park, 1st block, Near Market
No. 4, New Delhi - 110019
Sunday Worship: 11.00 a.m.

**For more information write to :**
**Church of Christ,** Post Box 3815, New Delhi - 110049

**MARATHI**

**WORDS OF HOPE**

Speaker : **Amul Bansod**
T.V. Program : **MCN News Channel**
Monday, Wednesday, Friday
7.30 a.m. to 8.00 a.m.

**For more information & Bible course write to**
**Aurangabad Church of Christ,** F/5 Siyon Nagar,
Pahadsingpura, Aurangabad. (MS) India
Mob. : 9049941066 / 9922262067

**BRALLE MAGAZINE & BRAILLE BIBLE COURSE** Available for
Visually Challenging People in Tamil/English/ Telugu Languages.

Write to : **THE VOICE OF TRUTH INTERNATIONAL-BRAILLE EDITION**
P.O. Box : 15, ARASARADI, MADUARAI-625 016. TAMILNADU
Email : obey2jesus@gmail.com Ph.: 92 4421 4421

# व्हाईस ऑफ ट्रुथ इंटरनॅशनल
# फॉर्म

- ❍ मी व्हाईस ऑफ ट्रुथ (मराठी) माझ्यासाठी मागवू इच्छितो / इच्छिते. मी चार अंकासाठी वर्गणी रू. १००/- चेक / मनीऑर्डरने पाठवित आहे. माझा पत्ता खाली दिला आहे.
- ❍ मी व्हाईस ऑफ ट्रुथ (मराठी) माझा मित्र ...................... ह्याच्यासाठी मागवू इच्छितो / इच्छिते. मी चार अंकासाठी वर्गणी रू. १००/- चेक / मनीऑर्डरने पाठवित आहे. माझा पत्ता खाली दिला आहे.
- ❍ मी २५ प्रतींची वर्गणी रू. ५०० पाठवित आहे. ह्याप्रकारे पूर्ण मंडळीच्या लोकांसाठी ह्या प्रती मागवून तुम्ही प्रचार करण्यासाठी मदत करून आशीर्वाद प्राप्त करू शकता.

**कृपा करून ह्या फॉर्मला भरून चेक सोबत एका पाकीटामध्ये टाकून किंवा मनीऑर्डर सोबत खाली दिलेल्या पत्त्यावर पाठवून द्यावे. चेक/मनीऑर्डर खाली दिलेल्या नावाने पाठवावे.**

**Amul Dayanand Bansod**
**F/5 Siyon Nagar, Near D.K.M.M. College, Lani Road,**
**Pahadsingpura, Aurangabad - 431 001 (M.S.) India**

Name ..........................................................................................
Add ...............................................................................................
.......................................................................................................
City .......................... State ....................... Pin ...............................

Name ..........................................................................................

Add ..........................................................................................

..................................................................................................

City .......................... State ....................... Pin ..............................

Name ..........................................................................................

Add ..........................................................................................

..................................................................................................

City .......................... State ....................... Pin ..............................

Name ..........................................................................................

Add ..........................................................................................

..................................................................................................

City .......................... State ....................... Pin ..............................

Name ..........................................................................................

Add ..........................................................................................

..................................................................................................

City .......................... State ....................... Pin ..............................

# [illegible]

[illegible]

- [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible]